७० वर्ष

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

सोमवार, दि. ०९ मार्च २०२६

www.dainikesandhya.com   www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०७३ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## राज ठाकरे रायगडावर; सदस्य नोंदणी सुरू करणार

मुंबई (दै. संध्या) : मनसे अध्यक्ष राज ठाकरे उद्या रायगडावर जाणार आहेत. ते तेथून मनसेच्या सदस्य नोंदणीचा कार्यक्रम सुरू करणार आहेत. प्रश्न आकड्याचा नाही. मनसेची सदस्य नोंदणी कायम मोठीच होते. पण यावेळी महाराष्ट्र म्हणून, मराठी म्हणून सामान्य मराठी माणसांची महाराष्ट्राचा पाईक होण्याची इच्छा किती तीव्र आहे आणि सरकार किती चुकीच्या पद्धतीने सर्व गोष्टी हाताळते आहे याचा राग सर्वांच्या मनात किती आहे हे यातून स्पष्ट होईल, असे ते म्हणालेत. मनसेची 9 मार्च 2006 रोजी स्थापना झाली. त्यानुसार उद्या या पक्षाचा 20 वा वर्धापन दिन आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी या निमित्ताने पक्षाच्या सदस्य नोंदणीचा कार्यक्रम हाती घेतला आहे. त्याची सुरुवात त्यांनी रायगडावरून करण्याची घोषणा केली आहे. ते रविवारी आपल्या एका पोस्टमध्ये म्हणाले, आपल्या पक्षाचा उद्या, 9 मार्च 2026 ला 20 वा वर्धापनदिन. मराठी माणूस आणि मराठी भाषा यांच्यासाठी आक्रमकपणे लढणाऱ्या पक्षाचा आणि एका विचाराचा हा वर्धापनदिन.

### ढिंग-टांग




# गड्यांनो मैदान मारलंच

### भारत तिसऱ्यांदा टी-२० वर्ल्ड चॅम्पियन : फायनलमध्ये विक्रमी २५५ धावा, न्यूझीलंडचा ९६ धावांनी सर्वात मोठा पराभव




**अहमदाबाद (दै. संध्या)**

ज्या मैदानावर काही काळापूर्वी भारतीय क्रिकेट चाहत्यांच्या पदरी निराशा पडली होती, त्याच अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर आज टीम इंडियाने सोनेरी इतिहास रचला आहे. टी-२० विश्वचषक २०२६ च्या अंतिम युद्धात न्यूझीलंडचा पराभव करत भारताने तिसऱ्यांदा विश्वविजेतेपदावर आपले नाव कोरले आहे. तीन वेळा टी-२० विश्वचषक जिंकणारा भारत हा जगातील पहिलाच संघ ठरला असून, या विजयाने भारतीय क्रिकेटचा दबदबा पुन्हा एकदा सिद्ध केला आहे. या हाय-व्होल्टेज लढतीत यजमान भारताने प्रथम फलंदाजी करताना २५५/५ असा डोंगर उभा केला होता.

**जुन्या जखमांवर फुंकर**

याच मैदानावर झालेल्या जुन्या पराभवाचे दुःख विसरून भारताने आज त्याच ठिकाणी विजयाचा गुलाल उधळला आहे.

प्रत्युत्तरात किवी संघाचा डाव १९ व्या षटकात अवघ्या १५९ धावांत आटोपला. यासह सलग दोनदा विश्वविजेतेपद पटकावणारा भारत हा जगातील पहिला देश ठरला आहे.

न्यूझीलंडच्या डावातील १९ व्या षटकात अभिषेक शर्माने टाकलेल्या सहाव्या चेंडूवर भारताच्या विजयावर अधिकृत शिक्कामोर्तब झाले. जॅकब डफीने मारलेला हवेतील फटका लॉंग-ऑन सीमारेषेवर उभ्या असलेल्या टिळक वर्माने अत्यंत चपळाईने टिपला. सीमारेषेच्या अगदी जवळ असल्याने स्वतःचा तोल सावरण्यासाठी टिळकने चेंडू हवेत उडवला आणि मैदानाच्या आत पुन्हा तो सुरक्षित झेलला. डफी बाद होताच अहमदाबादचे मैदान 'इंडिया-इंडिया'च्या जयघोषाने दुमदुमले आणि भारतीय खेळाडूंनी मैदानावरच जल्लोष सुरू केला.

या विजयाने केवळ चषक मिळाला नाही, तर इतिहासाच्या पानावर तीन अशा नोंदी झाल्या ज्या आजवर कोणालाही शक्य झाल्या नव्हत्या. क्रिकेटच्या इतिहासात आतापर्यंत कोणत्याही देशाला ३ वेळा टी-२० विश्वचषक जिंकता आलेला नव्हता. ही ऐतिहासिक कामगिरी करणारा भारत हा जगातील पहिलाच संघ ठरला आहे.

सलग दोन वेळा विश्वचषकावर नाव कोरून भारताने आपले निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले. 'यजमान देशाला मायदेशात विश्वचषक जिंकता येत नाही' हा प्रदीर्घ काळ चालत आलेला समज भारताने आज मोडीत काढला. मायदेशातील चाहत्यांच्या साक्षीने हा पराक्रम करून टीम इंडियाने ऐतिहासिक पराक्रमाची नोंद केली आहे. भारतीय डावाची सुरुवात संजू सॅमसन (८९) आणि अभिषेक शर्मा (५२) यांनी वादळी पद्धतीने केली. त्यानंतर तिसऱ्या क्रमांकावर आलेल्या ईशान किशननेही (५४) अर्धशतकी योगदान दिले. डावाच्या अखेरीस शिवम दुबेने केवळ ८ चेंडूत नाबाद २६ धावा कुटत भारताला विशाल धावसंख्येपर्यंत पोहोचवले.

## ब्रेकिंग न्यूज

### लेबनॉनवरील हल्ल्यात ४१ जणांचा मृत्यू

मुंबई (दै. संध्या) : इस्रायलने लेबनॉनवर मोठा हल्ला केला असून या हल्ल्यात ४१ जणांचा मृत्यू झाला आहे. नबी शीट येथे झालेल्या हल्ल्यानंतर मोठ्या खड्ड्याभोवती जळालेल्या इमारती, तुटलेली छते आणि जमिनीवर विखुरलेली शस्त्रे दिसून आली. इस्रायली लष्कराने लेबनॉनमधील नबी शीट परिसर रिकामा करण्याचा इशारा दिला होता. नबी शीटचे महापौर हानी मौसावी यांनी सांगितले, “या इशाऱ्यानंतर आम्ही मुलांना वाचवण्यासाठी त्यांना शहराबाहेर काढण्याची तयारी सुरू केली.” लेबनॉनच्या आरोग्य मंत्रालयाने सांगितले की नबी शीट आणि आसपासच्या भागात झालेल्या हल्ल्यांमध्ये ४१ जणांचा मृत्यू झाला असून ४० जण जखमी झाले आहेत. स्फोट इतके भीषण होते की एका कारने इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर जाऊन धडक दिली. या हल्ल्यात अनेक इमारती कोसळल्या आणि घरे उद्ध्वस्त झाली. एका उद्ध्वस्त घरात हिजबुल्लाहच्या नेत्यांचे फाटलेले पोस्टरही आढळले.

### अल्पवयीन मुलीवर ३ दिवस अत्याचार

मुंबई (दै. संध्या) : झारखंडमधील पाकूर जिल्ह्यात एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्कार झाल्याची घटना समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच संपूर्ण परिसर हादरून गेला. सहा आरोपींनी अल्पवयीन मुलीला तीन दिवस बंदी बनवून ठेवले. नंतर तिच्यावर सामूहिक बलात्कार केला. ही घटना जिल्ह्यातील मालपहारी ओपी पोलीस स्टेशन परिसरात घडली. पोलिसांनी सहा आरोपींपैकी तिघांना अटक केली आहे. इतरांचा शोध घेत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, पाकुर जिल्ह्यातील मालपहारी ओपी भागातील एक १५ वर्षीय मुलगी तिच्या गावातील एका दुकानात काही वस्तू खरेदी करण्यासाठी गेली होती. तिथे आधीच उपस्थित असलेल्या सहा तरुणांनी तिला जबरदस्तीने एका जड वाहनाच्या ट्रकमध्ये बसवले. एका निर्जन ठिकाणी नेले आणि ओलीस ठेवले. आरोपींनी तिच्यावर तीन दिवस सामूहिक बलात्कार केला.

### राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्याचा मृत्यू

सोलापूर (दै. संध्या) : करणी केल्याचा तोड म्हणून भंडारा उधळल्याच्या कारणावरून झालेल्या मारहाणीनंतर दोन दिवसांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या एका कार्यकर्त्याचा मृत्यू झाला. दशरथ अमोगसिद्ध शेंडगे (वय ४०, रा. भारतरत्न इंदिरा नगर) असे त्याचे नाव आहे. याप्रकरणी सदर बझार पोलिसांत अदखलपात्र गुन्हा दाखल आहे. याप्रकरणी चौकशी व शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर पुढील कार्यवाही केली जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. याप्रकरणी जगदीश भद्रे, शरण भद्रे, शंभू भद्रे व एका अनोळखीविरुद्ध अदखलपात्र गुन्हा दाखल झाला आहे. घरासमोर झालेल्या मारहाणीमुळे पती दशरथ यांचा मृत्यू झाल्याचा आरोप त्यांची पत्नी नेहा शेंडगे यांनी केला आहे.

## ‘राजकीय पोळी भाजण्याचे काम थांबवा’ : गिरीश महाजनांचा टोला

**मुंबई (दै. संध्या)**



उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातावरून सध्या राजकारण चांगलेच तापले आहे. या प्रकरणावरून आमदार रोहित पवार यांनी उपस्थित केलेल्या शंकांना आता राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांनी जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. अजितदादांच्या अपघाताचे कोणीही गलिच्छ राजकारण करू नये, आपल्या राजकीय फायद्यासाठी चुकीचे विधाने करणे थांबवावे, अशा शब्दांत महाजन यांनी नाव न घेता रोहित पवारांवर निशाणा साधला. गिरीश महाजन यांनी स्पष्ट केले की, या अपघाताची सखोल चौकशी व्हावी ही सर्वांचीच भावना आहे आणि त्यानुसार राज्य व केंद्र सरकारने तातडीने आदेश दिले आहेत. कोणी म्हणते बॉम्ब ठेवला, तर कोणी पायलटच्या माध्यमातून घातपाताचा संशय व्यक्त करतेय. अशा प्रकारे आपापल्या अकलेचे तारे तोडणे चुकीचे आहे. या प्रकरणाच्या चौकशीत 100 टक्के पारदर्शकता असून संभ्रमाची कोणतीही शक्यता नाही. जर कोणाला शंका असेल तर त्यांनी खुशाल दिल्लीला जाऊन अपील करावे किंवा तक्रार द्यावी.

## कागदपत्रे घेतली, तरीही ज्योती वाघमारेंना माहिती नव्हतं

**मुंबई (दै. संध्या)**

■ एकनाथ शिंदेंनी उलगडलं खासदार करण्याचं गुपित



गेल्या काही काळापासून ज्योती वाघमारे या आक्रमकपणे एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेची बाजू मांडत आल्या आहेत. ठाकरे गटाकडून होणाऱ्या प्रत्येक घणाघाती टीकेला ज्योती वाघमारे यांनी तितक्याच धारदार शब्दांत प्रत्युत्तर दिले आहे. मात्र, तरीही ज्योती वाघमारे या शिवसेनेतील इतर ज्येष्ठ नेत्यांच्या तुलनेत ज्योती वाघमारे नवख्या असल्याने त्यांना राज्यसभेसाठी संधी मिळेल, असे कोणालाही वाटले नव्हते. मात्र, एकनाथ शिंदे यांनी धक्कातंत्राचा वापर करत ज्योती वाघमारे यांना उमेदवारी दिल्याने अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला.

महाराष्ट्रातील राज्यसभेच्या सात जागा रिक्त झाल्या होत्या. यासाठी भाजपकडून 4, शिवसेना शिंदे गटाकडून 1, राष्ट्रवादी अजित पवार गटाकडून आणि शरद पवार गटाकडून 1 अशा सात जागा बिनविरोध झाल्या आहेत. शिवसेना शिंदे गटाकडून शिवसेनेच्या आक्रमक नेत्या ज्योती वाघमारे यांची राज्यसभेवर जाण्याची संधी मिळाली आहे. यामुळं शिवसेना शिंदे गटातील अनेक ज्येष्ठ नेत्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. दरम्यान, ज्योती वाघमारे यांच्या उमेदवारीबाबत बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले की, कमिटी स्थापन करण्यासाठी तुमची कागदपत्रे हवी हे सांगून आम्ही त्यांची डॉक्युमेंट घेतली होती. त्यानंतर त्यांना सांगितले की राज्यसभेसाठी आपण तुमचा अर्ज भरणार आहोत. सर्वसामान्य महिलांना आपण स्थान दिल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. प्रत्येक कार्यकर्त्यावर आमचं लक्ष असतं असंही ते म्हणाले. माझ्या वडीलांची तब्येत बरी नाही म्हणून मी येणार नव्हतो पण हा लाडका भाऊ बहिणीच्या प्रेमापासून वंचित रहायला नको म्हणून मी आलो असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले. निवडणुकीत आपण वार नाही तलवार आहे, ही शमशेरीची धार आहे हे सगळ्यांना दाखवलं. मी आईची तगमग आणि बायकोची काटकसर बघीतली म्हणून लाडकी बहिण योजना सुरू केल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. ज्योती वाघमारे या लाडक्या बहिणीला खासदार केल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. बचत गटांच्या माध्यमातून स्त्री सक्षम केले. विविध फुड ट्रक सुरु केले. सगळ्या पदांपेक्षा लाडका भाऊ ही माझी मोठी ओळख असल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. माझी आई वारली ही बातमी समजली तरी मी राजेंद्र गावित यांच्या भागात पाच ते सहा सभा घेतल्याचे एकनाथ शिंदे म्हणाले. गेल्या काही काळापासून ज्योती वाघमारे या आक्रमकपणे एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेची बाजू मांडतायेत.

## अजितदादांच्या अपघाताबाबत ९९ टक्के जनतेच्या मनात संशय

**पुणे (दै. संध्या)**

■ सरकारी अहवालावर विश्वास नाही, CBI चौकशी करा - महादेव जानकर



राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणाचे गूढ अधिकच गडद होत असून, आता या वादात राष्ट्रीय समाज पक्षाने (रासप) उडी घेतली आहे. "अजितदादांचा हा मृत्यू अपघात होता की घातपात, याबाबत महाराष्ट्रातील ९९ टक्के जनतेच्या मनात संशयाची पाल चुकचुकत आहे," असा खळबळजनक दावा करत 'रासप'चे संस्थापक अध्यक्ष महादेव जानकर यांनी या प्रकरणाची सीबीआय चौकशी करण्याची मागणी केली आहे. अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी सातत्याने उपस्थित केलेल्या प्रश्नांनंतर, आता एकेकाळी महायुतीचे घटक राहिलेल्या महादेव जानकर यांनीही आक्रमक पवित्रा घेतल्याने सरकारची कोंडी होण्याची शक्यता आहे. इंदापूर हा अजित पवारांचा बालेकिल्ला समजला जातो, तिथूनच जानकरांनी ही मागणी केल्याने या प्रकरणाला आता अधिक राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. पुण्यातील इंदापूर येथे माध्यमांशी संवाद साधताना महादेव जानकर यांनी राज्य सरकारच्या चौकशीवर सडकून टीका केली. ते म्हणाले, "अजित दादांसारख्या मोठ्या लोकनेत्याचा अशा पद्धतीने मृत्यू होतो, तेव्हा जनमानसात शंका उपस्थित होणे स्वाभाविक आहे. सध्या जो सरकारी अहवाल समोर येत आहे, त्यावर जनता विश्वास ठेवायला तयार नाही. त्यामुळे केवळ पोलीस तपासावर विसंबून न राहता, या प्रकरणाचे 'दूध आणि पाणी' वेगळे करण्यासाठी केंद्र सरकारने तातडीने हस्तक्षेप करावा." महादेव जानकर यांनी केवळ सीबीआय चौकशीच नव्हे, तर या तपासाच्या निष्पक्षतेसाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांची नियुक्ती करण्याची मागणी केली आहे.

"या प्रकरणामागे कोणतेही मोठे राजकीय कारस्थान दडलेले नाही ना, हे शोधणे गरजेचे आहे. जर सरकारला आपली प्रतिमा स्वच्छ ठेवायची असेल, तर त्यांनी या उच्चस्तरीय चौकशीला घाबरण्याचे कारण नाही. जे सत्य असेल ते जनतेसमोर आलेच पाहिजे, ही आमच्या पक्षाची अधिकृत भूमिका आहे," असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## संतोष देशमुख हत्याकांडातील आरोपीला दिलासा : जयराम चाटे तुरुंगाबाहेर

**बीड (दै. संध्या)**



मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडातील जयराम चाटे नामक आरोपी तब्बल 14 महिन्यानंतर काही तासांसाठी तुरुंगाबाहेर येणार आहे. कोर्टाने त्याच्या धाकट्या भावाच्या निधनानंतर करण्यात येणाऱ्या धार्मिक विधीस उपस्थित राहण्याची विशेष परवानगी दिली आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, जयराम चाटेचा छोटा भाऊ श्रीराम चाटे याचे गत 2 मार्च रोजी तांबवा गावात निधन झाले. हिंदू परंपरेनुसार, निधनानंतर बाराव्या दिवशी होणारा धार्मिक विधी महत्त्वाचा मानला जातो. त्यामुळे जयराम चाटेने आपल्या वकिलामार्फत या प्रकरणाची सुनावणी करणाऱ्या न्यायालयाकडे या विधीस उपस्थित राहण्याची परवानगी मागितली होती. त्याच्या अर्जावर गत 6 मार्च रोजी कोर्टात सुनावणी झाली. त्यात सरकारी वकील बाळासाहेब कोल्हे यांनी त्याच्या अर्जाला कडाडून विरोध केला. पण कोर्टाने सर्व बाजूंचा विचार करून अखेर जयराम चाटेला सकाळी 9 ते दुपारी 4 या वेळेत पोलिस बंदोबस्तात धार्मिक विधीस उपस्थित राहण्याची परवानगी दिली.

## ‘सावित्री जत्रा’ महिलांना स्वावलंबी करणारी चळवळ : उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

### उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते मिनी सरस सावित्री जत्रा जिल्हास्तरीय विक्री प्रदर्शनाचे उद्घाटन

**पुणे (दै. संध्या)**



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याने पावन झालेल्या भूमीत, त्यांच्या नावाने सुरु असलेली 'सावित्री जत्रा' हे केवळ एका प्रदर्शनाचं नाव नाही तर महिलांना स्वावलंबी करणारी एक चळवळ आहे, यामधील महिला बचत गटाच्या उत्पादनाला जागतिक पातळीवर होणारी मागणी ही अभिमानाची बाब आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले. जिल्हा परिषद, पुणे आणि उमेद-महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्यावतीने कृषी महाविद्यालय मैदान, सिंचन नगर येथे आयोजित 'मिनी सरस सावित्री जत्रा' जिल्हास्तरीय विक्री प्रदर्शनाचे उद्घाटन आणि यशवंत पंचायतराज अभियान विभागस्तरीय पुरस्कार व महाआवास अभियान जिल्हास्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्याच्याप्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी खासदार डॉ. मेधा कुलकर्णी, आमदार बापूसाहेब पठारे, शंकर मांडेकर, यशदाचे उपसंचालक डॉ. मल्लीनाथ कलशेट्टी, उपायुक्त नितीन माने, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक शालिनी कडू, उप मुख्य कार्यकारी अधिकारी भूषण जोशी, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या सदिच्छादूत शिवाली परब आदी मान्यवर उपस्थित होते.

जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा देऊन उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, सावित्री जत्रा हे नाव सावित्रीबाई फुले यांच्या विचारांना, त्यांच्या सक्षमीकरणाच्या कार्याला समर्पित आणि साजेसे आहे. सावित्रीबाईंनी शिक्षण आणि स्वावलंबनाच्या माध्यमातून महिलांना सक्षम करण्याचा मार्ग दाखवला, त्याच विचारांची जत्रा आज ग्रामीण भागातील शेकडो महिला बचत गटांच्या माध्यमातून प्रत्यक्षात साकार होत आहे. येथील प्रदर्शनात सुमारे १५० महिला स्वयंसहायता समूह सहभागी झाले असून ग्रामीण कला, परंपरा व संस्कृतीची ओळख असणारी महिला उत्पादने प्रदर्शित केली जात आहेत, ही स्तुत्य बाब आहे. प्रत्येक वस्तूमध्ये ग्रामीण भागातील भगिनीची मेहनत, स्वप्न आणि एक जिद्द सुध्दा आहे. सर्व पुणेकरांनी या प्रदर्शनाला भेट द्यावी, अधिकाधिक वस्तूची खरेदी करून कुटुंबाच्या संसाराला हातभार लावावा.

पान ३ वर

# संपादकीय

मार्च २०२६मध्ये राज्यसभेतील ३७ सदस्य निवृत्त होत आहेत आणि जून २०२६ मध्ये आणखी २४. राज्यसभेच्या २४५ सदस्यीय संरचनेत हा बदल केवळ सांख्यिक नाही; तो राजकीय प्रवाहाला नव्या दिशेने वळवू शकणारा आहे. आम्ही सन २०१४ किंवा २०२९ची लोकसभा संख्याबळाच्या अंगानं पाहिली नसेल तर या वर्षाअखेर राज्यसभेचे चित्र डोळ्यासमोर आणा! त्या दोन्ही लोकसभांमध्ये (सभ्य भाषेत) भक्कम असं संख्याबळ असणारा सत्तापक्ष आणि दुर्बल विरोधक असं चित्र होतं, तेच आता वरिष्ठांच्या सदनात दिसणार आहे. त्याचा निमित्त ठरतंय ती यंदाची द्वैवार्षिक निवडणूक. भारतीय संसदीय राजकारणात २०२६ हे वर्ष

## नव्या अध्यायासाठी राज्यसभा सज्ज

राज्यसभेच्या दृष्टीनं संक्रमणाचं, पुनर्संतुलनाचं आणि नव्या नेतृत्वाच्या उदयाचं ठरणार आहे. मार्च २०२६ मध्ये ३७ सदस्य निवृत्त होत आहेत आणि जून २०२६ मध्ये आणखी २४, म्हणजेच एका वर्षात एकूण ६१ सदस्य राज्यसभेतून बाहेर पडणार आहेत. राज्यसभेच्या २४५ सदस्यीय संरचनेत हा बदल केवळ सांख्यिक नाही; तो राजकीय प्रवाहाला नव्या दिशेने वळवणारा आहे. अनुभव आणि संसदीय परंपरेमध्ये नव्या पिढीच्या आगमनाची ती वर्दी असेल. निवृत्त होणाऱ्या ६१ सदस्यांमध्ये काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, माजी पंतप्रधान एच.डी. देवगौडा, दिग्विजयसिंह, शरद पवार, अभिषेक मनू सिंघवी यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्यांचा समावेश आहे. यांतील शरद पवार यांच्यासह तिघे पुन्हा राज्यसभेवर येणार आहेत. राज्यसभेचे सदस्य थेट जनतेकडून निवडले जात नसल्याने विधानसभांतील गणित निर्णायक ठरते. ज्या राज्यांत भाजप किंवा तिची सहयोगी आघाडी सत्तेत आहे, तेथे भाजपला अतिरिक्त जागा मिळवण्याची संधी होती. किमान महाराष्ट्रापुरते तरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप नेतृत्वाने – किंबहुना शरद पवार हेच नाव असल्याने – याबाबतीत उदार धोरण स्वीकारलं आणि महाविकास आघाडी आणखी तोळामासा होण्यापासून तूर्तास वाचली! या निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात बिहारची सर्वाधिक चर्चा होणं स्वाभाविक आहे; कारण या राज्यातले तीन चेहरे केवळ बिहारच नव्हे, तर राष्ट्रीय राजकारणात गाजणारे आहेत. गेली काही वर्षं बिहारच्या राजकारणात स्वतःला झोकून देणारे भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे अखेर राज्यसभेवर येत आहेत. नवनियुक्त भाजप अध्यक्ष नितीन नवीन यांनाही २०१४नंतरच्या परंपरेप्रमाणे भाजप राज्यसभेवर आणत आहे. बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी तब्बल दोन दशकांनंतर राज्याला रामराम करून पुन्हा संसदेत प्रवेश करणं ही बाब राष्ट्रीय, विशेषतः हिंदी पट्ट्याच्या राजकारणासाठी दूरगामी पडसाद उमटवणारी ठरावी. नितीश यांनी आपले पुत्र निशांतकुमार यांना अखेर राजकारणात आणून बिहारी 'विहार' सोडला आहे! आता त्या राज्यावर भाजपची भक्कम पकड असेल आणि अमित शहा यांनी निवडणूक प्रचारात दिलेल्या आश्वासनाप्रमाणे झालंच तर सम्राट चौधरी यांच्या पदनामामागचा 'उप' हटविण्याची ही उत्तम संधी असेल! बिहारच्या पलीकडं भाजपच्या यादीकडे पाहिलं तर यावेळी, केवळ नावांची घोषणा यावरच नाही, तर त्यामागील रणनीती अधिक महत्त्वाची असल्याचं दिसतं. उमेदवार निवडताना जातीय संतुलन आणि संघटनेवरील निष्ठा याबरोबरच भाजप नवीन पिढीकडे नेतृत्वाची धुरा सोपवण्याची प्रक्रिया किती वेगाने करतो आहे हेही या संपूर्ण प्रक्रियेत दिसलं आहे. या निवडणुकीनंतर राज्यसभेत एनडीएचं बहुमत आणखी भक्कम होईल आणि आधीच अनेकदा विस्कळित भूमिका घेणारे विरोधक कमकुवत! २०२६ मधील मार्च आणि जून या दोन्ही टप्प्यांतल्या निवडणुकांनंतर भाजपची एनडीएसह ताकद सव्वाशेचा टप्पा ओलांडून १३० सदस्य संख्येकडे जाईल. म्हणजेच महत्त्वाची विधेयक मंजूर होताना आता लोकसभेच्या तुलनेत राज्यसभेत तुलनेने शांततेचा अनुभव भाजपला येईल! दुसरीकडे काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांनी आपले वरिष्ठ आणि काही नवे प्रभावी चेहरे पुढे आणले, तर ते राज्यसभेत वैचारिक संतुलन राखू शकतील.

## संस्कृत सुभाषित

अन्योन्यसमुपष्टम्भादन्योन्यापाश्चयेण च
ज्ञातय: संप्रतवर्धन्ते सरसीवोत्पलान्युत ॥
(उद्योगपर्व, अध्याय ३६, ३६, महाभारत)
अर्थ –तळ्यात वाढणाऱ्या कमळाप्रमाणे, परस्परांस सहाय्य करून व परस्परांचा आश्रय घेऊन समुदायाचा उत्कर्ष होत असतो.

## आगामी साप्ताहिकी

९ मार्च २०२६ सोमवार
श्री एकनाथ षष्ठी
माधवनाथ महाराज पुण्यतिथी – चित्रकूट, इंदौर
बगाजी महाराज यात्रा – वरूड बगाजी (अमरावती)
पैठण यात्रा

१० मार्च २०२६ मंगळवार
सवित्रीबाई फुले स्मृतिदिन

११ मार्च २०२६ बुधवार
कलाष्टमी
वषीतपारंभ (जैन
शहादते हजरत अली

१२ मार्च २०२६ गुरुवार
यशवंतराव चव्हाण जयंती
मामा महाराज देशपांडे पुण्यतिथी – पुने
देव महाराज पुण्यतिथी – कार्ला (यवतमाळ)

१३ ऑगस्ट २०२० शुक्रवार
पारशी आबान मासारंभ
रामानंद बिडकर महाराज पुण्यतिथी – पुणे

१४ मार्च २०२६ शनिवार

१५ मार्च २०२६ रविवार
पापमोचनी एकादशी
श्रवणोपवास
जागतिक ग्राहक दिन
नामदेव संस्थान उत्सव – नर्सीनामदेव (हिंगोली)

## उपदेशकथा

### फसवी नक्कल

एक नकलाकार अनेकांच्या नकला करून दाखवित होता. प्रेक्षक खूष होते. त्यांनी त्याला डुकराच्या पिलाचा आवाज काढण्यास सांगितले. त्याने तसा आवाज काढला. प्रेक्षकांनाही तो आवडला. ते त्याचे कौतुक करू लागले. इतक्यात एक घोंगडीवाला गावकरी म्हणाला, 'ही नक्कल बरोबर साधली नाही.' प्रेक्षक त्याला म्हणाले, 'मग तू करून दाखव ना' तो रंगमंचावर आला. घोंगडे अंगावर घेतले आणि आवाज काढू लागला. तर प्रेक्षकांनी त्याची खिल्ली उडविली. हेटाळणी केली तेव्हा त्याने घोंगडीत लपवलेले डुकराचे पिलू बाहेर काढले व म्हणाला, 'देखाव्याला भुलणारे तुम्ही लोक. अहो मी घोंगड्यात डुकराचे पिलू लपवून लपवून त्याला चिमटे घेत होतो. ते ओरडत होते तर तुम्ही प्रत्यक्ष डुकराच्या पिलाचा आवाज खोटा ठरवलात. अन् भ्रष्ट नक्कल खरी ठरवलीत. धन्य !'

कथा उपदेश : खोट्या गोष्टींना भुलू नका.

## पंचांग

पंचांग
९ मार्च २०२६
सोमवार
विक्रम संवत्– २०८२
फाल्गुन शके
संवत्– १९४७
संवत्सर – विश्वावसूनाम
अयन– उत्तरायणारंभ
मास– फाल्गुन
ऋतु– सौर वसंत
कृष्ण पक्ष
तिथि:षष्टी २३:२७:२२
नक्षत्र:विशाखा १६:११:१३
योग:व्याघात ०७:३५:१२
करण:गर १०:१७:११
करण:वणिज २३:२७:२२
सूर्य:कुम्भ
चन्द्र:वृश्चिक०९:२९:३१
हिजरी सन् – १४४६
मुस्लिम मास – रमजान
तारीख – १९
विशेष
श्री एकनाथ षष्ठी
माधवनाथ महाराज पुण्यतिथी – चित्रकूट, इंदौर
बगाजी महाराज यात्रा – वरूड बगाजी (अमरावती)
पैठण यात्रा

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८८१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 4 | 5 | | | 8 | | 6 | |
| | | 6 | 1 | 4 | | | | |
| | 9 | 8 | | 6 | | 7 | | |
| | | 1 | 7 | 2 | | | | 6 |
| 2 | 6 | | | | | | 7 | 5 |
| 5 | | | | 3 | 4 | 1 | | |
| | | 4 | | 7 | | 9 | 1 | |
| | | | | 5 | 1 | 6 | | |
| | 1 | | 4 | | | 5 | 3 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ८८० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 3 | 4 | 6 | 9 | 5 | 8 | 2 | 1 |
| 1 | 6 | 2 | 7 | 4 | 8 | 3 | 5 | 9 |
| 8 | 5 | 9 | 3 | 2 | 1 | 4 | 7 | 6 |
| 5 | 1 | 3 | 2 | 8 | 6 | 7 | 9 | 4 |
| 4 | 2 | 7 | 9 | 5 | 3 | 6 | 1 | 8 |
| 9 | 8 | 6 | 4 | 1 | 7 | 5 | 3 | 2 |
| 6 | 4 | 5 | 1 | 3 | 2 | 9 | 8 | 7 |
| 3 | 7 | 1 | 8 | 6 | 9 | 2 | 4 | 5 |
| 2 | 9 | 8 | 5 | 7 | 4 | 1 | 6 | 3 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १७९६ – नेपोलियन बोनापर्टने जोसफैन डी बीऔरनेसशी विवाह केला.
- १८९३ – काँगो कन्नबल्सने हजारो अरबांना ठार मारले.
- १९१६ – जर्मनीने पोर्तगालच्या विरोधात युद्ध घोषित केले.
- १९९५ – ग्रीसचे राष्ट्रपती कोंस्टनटैन करामानलीस यांनी राजीनामा दिला.

### राष्ट्रीय

- २००८ – गोव्याचे राज्यपाल एस. सी. जमीर यांनी महाराष्ट्राचे नवे राज्यपाल म्हणून सूत्रे स्वीकारली.
- २००८ – कोलकाताच्या पूर्व भागात पंचान्ना गावात भीषण आगीत ६०० झोपड्या जळून राख झाल्या.

### जन्म

- १५६८ – इटलीचा राहजकुमार अलोसियस वॅन गोंजगा याचा जन्म.
- १९०० – क्रोशियाचा इटालीयन राजा ऐमोन डुक ऑफ स्पोलीटा यांचा जन्म.
- १९२९ – गुयानाचे राष्ट्रपती हॅग डेसमंड होएट यांचा जन्म.

### निधन

- १६६१ – फ्रांसचे मुख्यमंत्री जुलेस कार्डीनल मजरीन यांचे निधन.
- १८२४ – हॉलंड,झीलंड व फ्रीसलंडचे धर्मगुरु जकोबस जे. क्रेमर यांचे निधन.



- १९९२ – इस्त्राईलचे पंतप्रधान मीनचीम बीजीन यांचे निधन.

### : SMS :

Son: Dad, what is an idiot?
Dad: An idiot is a person who tries to explain his ideas in such a strange and long way that another person who is listening to him can't understand him. Do you understand me?
Son: No.

### हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३४.५ | २१.८ |
| अहमदनगर | ३३.१ | २१.३ |
| अकोला | ३६.५ | २३ |
| अमरावती | ३६ | २३.१ |
| बीड | ३६.९ | २२.९ |
| भंडारा | ३६ | २०.८ |
| बुलढाणा | ३३.७ | १६.५ |
| चंद्रपूर | ३६.९ | २२.८ |
| चेन्नई | ३७.८ | २१.३ |
| नवी दिल्ली | ३३.२ | १९.४ |
| धुळे | ३४.७ | २३.१ |
| गोंदिया | ३४.५ | १९.९ |
| जळगाव | ३७.५ | २२.४ |
| कोल्हापूर | ३४.१ | १९.९ |
| लातूर | ३४.२ | २१.२ |
| मुंबई | ३४.८ | २५.९ |
| नागपूर | ३५.८ | २१.२ |
| नांदेड | ३६.५ | २२.५ |
| नंदूरबार | ३३.८ | २२.७ |
| नाशिक | ३४.१ | २०.४ |
| पुणे | ३२.८ | २०.३ |
| पंढरपूर | ३५ | २१.६ |
| सातारा | ३४.५ | १९.८ |
| सांगली | ३४.७ | २० |
| सोलापूर | ३५.४ | २३.७ |
| वर्धा | ३७.५ | २३.१ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:उत्तर
आर्थिकदृष्ट्या कोणत्याही आश्वासनांवर विसंबून न राहता हाती येईल तेच खरे ही भूमिका घ्या.

**वृषभ :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा:दक्षिण
नोकरी–व्यवसायात मोठे लाभ होतील तसे परिचितांचा गट वाढेल.

**मिथुन :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:दक्षिण
वैवाहिक जीवनात वैवाहिक साथीदाराचा पूर्ण पाठिंबा आपले मनोधैर्य वाढवणारा ठरेल.

**कर्क :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: पश्चिम
एखादी महत्त्वाची पण विलंबाने झालेली कृती फायद्याची जाणवेल.

**सिंह :** शुभ रंग,गुलाबी शुभ दिशा:पश्चिम
सामाजिक यशात थोरामोठ्यांचा सहभाग अपेक्षित राहील. काहींना नवा प्राप्तीमार्ग हाती आल्याचा आनंद होईल.

**कन्या :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा: पश्चिम
नोकरी–व्यवसायात फार मोठा धोका पत्करणे सध्या तरी योग्य ठरणार नाही.

**तुळ :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा : उत्तर
काही विशेष कामानिमित्त आपणास लांबच्या प्रवासाचे बेत आखावे लागतील.

**वृश्चिक :** शुभ रंग: आकाशी, शुभ दिशा:उत्तर
काहींना अचानक धनलाभाच्या संधी मालामाल करतील. दीर्घ सहलीचा आनंद सहकुटुंब लुटाल.


**धनु :** शुभ रंग: निळा, शुभ दिशा: उत्तर
उद्योगधंद्यात काही व्यवहार अनपेक्षित फलदायी ठरतील. संततीच्या महत्त्वाच्या प्रश्नामध्ये निर्णायक यश मिळेल.

**मकर :** शुभ रंग: आकाशी, शुभ दिशा: पूर्व
व्यापारी वर्गाला आपले व्यापारकौशल्य सिद्ध करता येईल.

**कुंभ :** शुभ रंग: पिवळा, शुभ दिशा: पूर्व
आर्थिकदृष्ट्या अनेक मोठे प्रश्न हातावेगळे करू शकाल. नोकरी व्यवसायात अनुकूल घटना घडतील.

**मीन :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: पूर्व
निरनिराळ्या सुचणाऱ्या कल्पना व्यावसायिकदृष्ट्या आत्ताच अंमलात आणू नका. जवळचा प्रवास करा.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८८१



**आडवे शब्द**
१. जबरदस्तीची हप्तावसुली
४. उगीच
७. खाळगी, मोठे भोक
९.श्वास, धमकी
१०. अधिक महिना
११. नंतर
१२. शिल्लक राहिलेला कचरा
१३. दया करणारा (परमेश्वर)
१४. जीभ
१५. हत्तीसारख्या डौलदार चालीची
१७. त्रस्त
१९. हळूच
२१. गर्दीची धावाधाव
२३. सूट
२४. हेकट
२५. द्रव्य
२६. अभिनेता
२७. नस्काराचा एक शब्द
३०. पांढरपेशा, नोकरदार
३३. संताप, क्रोध
३४. डोक्यावर दहाचा आकडा मिरवणारा
३५. अंधार
३६. बर्फ
३८. पळसाचा डिंक
३९. महाभारतकाळापासून प्रसिद्ध बर्फाळ पर्वतराजी
४१. देवाण–घेवाण
४३. अरण्य
४५. चांदी
४७. मच्छर, चिलट
५०. भान, समज
५१. नाकारणे
५३. नमनीय
५६. गवगवा
५८. गरजू
६०. रथावर बसलेला
६१. हुक्की, लहर
६२. गर्दीचा विळखा
६३. उन्हाळ्यात दिलासा देणारा पाऊस
६४. हिंदीत सरसरीत मिश्रण
६५. दया
६८. डोळे असणारे फळ
७०. दरवळ
७३. कमी केलेला
७४. उत्तराधिकारी
७५. उमाळा
७६. उडाणटप्पू

**उभे शब्द**
१. संरक्षणासाठी खोदलेला चर
२. शंकराजवळचे छोटे चर्मवाद्य
३. कपड्याला लावलेली चुणीदार पट्टी
४. विसराळू
५. इच्छा
६. उबदार पांघरुण (इंग्रेजी)
७. बारीक खड्डा
८. विद्युल्लता
१०. मध
१२. हलव्याचा कंद
१५. गणपतीचे एक नाव
१६. हिंदीत भेसळ
१८. नातेवाईक
१९. अपहार, पैशाचा घोटाळा
२०. मोगऱ्याची माळ
२१. निष्णात
२२. वेतन
२३. घोंगड्या विणणारी जमात
२५. मालक
२८. माझे
२९. थोरवी
३१. खण
३२. माणूस
३३. कौसल्यापुत्र
३४. घाणेरडे पाणी
३७. जखमेवरील स्निग्ध औषध
३८. मिठी
३९. फायदेशीर, कल्याणकारी
४०. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री (नाव)
४२. शेंडीभोवती राखलेले केस
४४. एक लहान गड्डाभाजी
४६. आपले राष्ट्रगीत
४८. रेशमी धोतर
४९. शिक्षा
५०. जाण्याची आज्ञा, मात्र हिंदी गाण्यात असल्यास लाडिकपणे होणारी
५२. मातीचा कण
५४. पाणी
५५. योग्य, समर्पक
५६. ओझे वाहणारे जनावर
५७. उन्हाळ्यात केले जाणारे साठवणीचे पदार्थ
५९. यंत्रातील घर्षण कमी करणारे तेल
६४. चिक्कूसाठी प्रसिद्ध गाव
६५. वाळवी
६६. मेख, रहस्य, मर्म
६७. पत्नी
६८. शेवट, अखेर
६९. नूतन
७०. राहण्याची जागा
७१. झीज, मडके
७२. रोखलेली नजर
७४. जागृत, ठिकाण

### जम्बो शब्दकोडे क्र. ८८० चे उत्तर

आडवे उत्तर : १.जवळपास ४.गजवदन ८.पाप १०.तारामती १२.यजमान १३.मरगळ १५.समाधान १७.मग १८.तम १९.यंत्रमाग २१.नवा २२.सदाचार २३.सव २४.शहर २५.रयत २८.सर्वत्र २९.प्रयास ३१.मागे हटणे ३३.कोमट ३५.ज्ञात ३६.कळस ३७.नर ३८.मुद्दाम ३९.नाका ४०.गीत ४२.फटका ४३.लखलखीत ४८.रसातल ५०.दमा ५२.जन ५३.मासा ५५.चल ५६.कम लाकर ५७.महिना ५८.वध ६०.वारूळ ६१.बारदान ६३.धनगर ६५.लगत ६७.मधमाशी ७०.वाळू ७१.आळस ७३.महान ७५.सरणे ७६.घोडनवरा ७९.सल ८०.नात ८१.फारसा ८२.ओळ ८३.समानता

उभे उत्तर : १.जनमत २.पाताळयंत्री ३.सरा ४.गती ५.वर्तमानपत्र ६.नयन ७.दिमाखदार ९.पलंग ११.मलमास १४.रमणीय १६.धावा १७.मरणयातना २०.गवसणे २२.सहकार २४.शरम २५.रजक २६.तमासगीर २७.दहन २९.प्रज्ञा ३०.सरकारजमा ३२.टरफल ३३.कोमल ३४.टपाल ३८.मुकादम ३९अ.कारनामा ४१.तसाच ४४.खबरबात ४५.खीज ४६.तनमनधन ४७.मामा ४९.तलवार ५१.मालामाल ५४.सावध ५६.कळवळणे ५९.धनवान ६२.दाम ६४.गळू ६६.गरुड ६८.शीतलता ६९.सामना ७१.आरसा ७२.पाव ७४.हात ७५.सर ७६.घोळ ७७.नफा ७८.रास ७९.सन

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### रंगपंचमी व महिला दिनानिमित्त ‘खडकवासला जलाशय रक्षण अभियानात उत्स्फूर्त सहभाग

पुणे (दैनिक संध्या) : रंगपंचमी आणि आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून पर्यावरण संवर्धनाची जाणीव ठेवत मोठ्या संख्येने महिलांनी ‘खडकवासला जलाशय रक्षण अभियानात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. हिंदु जनजागृती समितीच्या पुढाकाराने राबविण्यात येणाऱ्या या मोहिमेत महिलांनी जलाशय परिसरात नागरिकांचे प्रबोधन करून रंग, कचरा किंवा इतर प्रदूषक पदार्थ जलाशयात टाकू नयेत, यासाठी जनजागृती केली. गेल्या २४ वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येणारे हे अभियान यंदाही १०० टक्के यशस्वी झाले. या मोहिमेला शासन आणि प्रशासनाचे सहकार्य लाभले असून पोलीस, स्थानिक प्रशासन तसेच विविध विभागांनी आवश्यक मदत केली. पर्यावरणाबद्दल जागरूक नागरिकांनीही स्वयंस्फूर्तीने सहभाग नोंदवत अभियानाला बळ दिले. या उपक्रमाची सुरुवात सकाळी भगवान श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे पूजन आणि आरतीने करण्यात आली. पुणे शहर, पिंपरी-चिंचवड, सासवड, हडपसर, भोर आणि आळंदे वाडी परिसरातून मोठ्या संख्येने नागरिक व हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्ते या मोहिमेत सहभागी झाले. या अभियानात अधिवक्ता, संगणक अभियंते, उद्योजक आणि पत्रकार यांनीही सक्रिय सहभाग घेतला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी समितीच्या कार्याचे कौतुक करत जलप्रदूषण रोखण्यासाठी अशी अभियाने लोकचळवळ बनण्याची गरज व्यक्त केली. कार्यक्रमाच्या शेवटी हिंदु जनजागृती समितीचे पराग गोखले यांनी सर्व सहभागी नागरिक तसेच सहकार्य करणाऱ्या यंत्रणांचे समितीच्या वतीने आभार मानले.



### अखिल मंडई मंडळाच्यावतीने पारंपरिक पद्धतीने रंगपंचमी उत्साहात साजरी

पुणे (दैनिक संध्या) : रंगांची मुक्त उधळण, गुलालाची बरसात आणि रंगांनी भरलेल्या हौदात खेळण्याचा जल्लोष अशा उत्साही वातावरणात अखिल मंडई मंडळाच्या वतीने पारंपरिक पद्धतीने रंगपंचमी साजरी करण्यात आली. चिमुकल्यांपासून तरुणाईपर्यंत तसेच विविध गणेशोत्सव मंडळांच्या कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत रंगोत्सवाचा मनमुराद आनंद लुटला. अखिल मंडई मंडळाच्या वतीने आयोजित या रंगपंचमी उत्सवावेळी मंडळाचे अध्यक्ष अण्णा थोरात यांच्यासह विश्वास भोर, विक्रम खन्ना, सुरज थोरात आणि राजेश कराळे उपस्थित होते. शहरातील विविध गणपती मंडळांचे अध्यक्ष व कार्यकर्त्यांनीही या रंगोत्सवात सहभाग घेतला. अण्णा थोरात म्हणाले, धूलिवंदनापासून सुरू झालेल्या वसंतोत्सवाची सांगता रंगपंचमीच्या दिवशी होते. या दिवशी पारंपरिक पद्धतीने रंग खेळण्याची प्रथा आहे. मात्र, सध्या होळीच्या दिवशीच रंग खेळण्याची नवी परंपरा रुजू होताना दिसते. ही परंपरा जपण्यासाठी आणि नागरिकांना पारंपरिक पद्धतीने रंगपंचमीचा आनंद घेता यावा यासाठी मंडळाच्या वतीने दरवर्षी उत्साहात रंगपंचमी उत्सवाचे आयोजन केले जाते.



### 400 हून अधिक महिला शंख वादकांनी एकत्रितपणे केला शंख वादन विश्वविक्रम

■ हिंदुस्थानातील पहिल्या केशव शंखनाद पथकातर्फे आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : महिला शक्ती, परंपरा आणि सांस्कृतिक वारसा यांचा गौरव करण्यासाठी पुण्यामध्ये जागतिक महिला दिनानिमित्त महिलांच्या सन्मानार्थ तब्बल ४०० हून अधिक महिला शंख वादकांनी एकत्रितपणे केला शंख वादन विश्वविक्रम केला. हिंदुस्थानातील पहिले विश्वविक्रमी शंखवादकांचे केशव शंखनाद पथक यांच्या वतीने याचे आयोजन करण्यात आले होते. कर्वेनगर मधील महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेत हा विश्वविक्रम साकारला गेला. यावेळी महापौर मंजुषा नागपुरे, अतिरिक्त पोलिस अधीक्षक (नि) रेखा साळुंखे, सोल्जर्स इंडिपेंडंट रिहॅबिलिटेशन फाउंडेशनच्या संस्थापिका सुमेधा योगेश चिथडे, निवृत्त मुख्याध्यापक उमा जोशी, क्रीडापटू प्रीती म्हस्के, वर्ल्ड रेकॉर्ड इंडियाच्या सुषमा नार्वेकर, पथकाचे संस्थापक अध्यक्ष नितीन महाजन आदी उपस्थित होते. मंजुषा नागपुरे आणि सुषमा नार्वेकर यांच्या हस्ते पथकातील बाल महिला वादकाला मेडल घालून विश्वविक्रम झाल्याची घोषणा करण्यात आली. ओंकाराने शंखवादन विश्वविक्रमाला प्रारंभ झाला. त्यानंतर शंख मंत्राचे पठण देखील करण्यात आले. शंखावर ब्रह्मनाद, सात खंड, अर्धवलय, तुतारी, पूर्णवलय, सुदर्शन चक्र, मुक्तछंद ही सात आवर्तने सादर करण्यात आली. गजानना, श्री दत्त, श्री राम जयराम हे तीन मंत्र घोष देखील शंखावर सादर करण्यात आले. यानंतर सादर झालेली शंख, डमरू आणि संबळाची जुगलबंदी हे उपस्थितांसाठी विशेष आकर्षण ठरले. मंजुषा नागपुरे म्हणाल्या, स्त्रियांना यापूर्वी संघर्ष होता. त्यांना सन्मान मिळावा, यासाठी झटणारे अनेक महामानव आणि योगिनी होऊन गेल्या. महिलांनी सक्षम होण्यासाठी केवळ शिक्षित होणे महत्वाचे नाही तर सुशिक्षित होणे गरजेचे आहे. शंखवादन आणि महिला हा विषय पूर्वी नव्हता. आता शंखवादन पथकाच्या माध्यमातून आजच्या आणि पुढच्या पिढीला हे पाहायला मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. उपक्रमासाठी पथकाने एक महिला समिती तयार केली होती त्यामध्ये महिला प्रमुख शीला गिरमे यांच्या समवेत विजया कापसे, संगीता रेडे, लीना पंजाबी, शालन चव्हाण, संगीता भिडे, वीणा झिरपे, अनुजा कुलकर्णी, अमृता सागर, राठोड, अनिता डोमाळे, राखी इंगळे, गायत्री मढीकर, जोती संगमनेरकर, वृषाली धोडगे, शितल नाईक व सर्व आवर्तन लिड वैष्णवी सराफ व गार्गी साळुखे यांनी केले. आदिती दीक्षित यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. संयोगिता जोशी यांनी सूत्रसंचालन केले. आभार प्रदर्शन सुप्रिया सराफ यांनी केले.

# बचत गटांना एकाच दिवशी ४० कोटी रुपयांचे कर्ज वाटप

## अर्थसंकल्पातही महिलांना स्वावलंबी आणि सक्षम बनवण्याच्या दिशेने पाऊल

श्री. वाघमारे म्हणाले, जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांना शहरी बाजार पेठेशी जोडण्याचा उपक्रम आहे. ग्रामीण संस्कृती, बाजार पेठेला वाव देण्यासोबतच त्यांच्या कर्तृत्वाचा सन्मान करणारा उत्सव आहे. जिल्ह्यात दोन लाखपेक्षा अधिक लखपती दीदी झाल्या आहेत. सावित्री जत्रा पाच दिवस चालणार असून पुणेकरांनी अधिकाधिक वस्तूंची खरेदी करावी, असे आवाहन श्री. वाघमारे यांनी केले. श्रीमती पवार यांच्या हस्ते पात्र लाभार्थ्यांना कर्ज वितरण करण्यात आले. उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी यावेळी कार्यक्रमस्थळी स्टॉलला भेट देऊन उत्पादनाविषयी माहिती जाणून घेतली आणि महिला बचत गटांच्या सर्व भगिनींचे कौतुक केले.

पुणे (दै. संध्या) :

पान १ वरून

गत वर्षीसुद्धा मिनी सरस सावित्री जत्रेत बचत गटांना एकाच दिवशी जवळपास १९ कोटी रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले; आज देखील एकाच दिवशी ४० कोटी रुपयांचे कर्ज वाटप बचत गटांना करण्यात आले. यामाध्यमातून गेल्या एक वर्षात साधारणपणे ४०० कोटी रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले असून यामुळे 'सरस सावित्री जत्रा' कार्यक्रमाचा दर्जा दरवर्षी सरस होत चालला आहे, हेच यामधून सिद्ध होत आहे. यापुढे आपण एकत्रितरित्या तो अजून सरस करण्याचा प्रयत्न करुया.

राज्याचे मुख्यमंत्री तथा वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सादर केलेल्या अर्थसंकल्पात ' मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेसाठी भरीव तरतूद करण्यात आली आहे.



एकल महिलांच्या कल्याणासाठी सुयोग्य धोरण, 'लखपती दीदी' उपक्रमाच्या माध्यमातून महिलांना स्वावलंबी आणि सक्षम बनवण्याच्या दिशेने ठोस पावले उचलण्यात येत आहेत.

येत्या आर्थिक वर्षात २५ लाख महिलांना लखपती दीदी करण्याचं उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. १३ जिल्ह्यांमध्ये 'उमेद मॉल' उभारण्यास मान्यता देण्यात आली असून यामुळे महिला बचत गटाच्या आमच्या ग्रामीण भागातल्या माता भगिनींना त्यांनी तयार केलेल्या उत्पादनांना मोठी बाजारपेठ तयार करण्यात आली आहे. यंदाचं वर्ष आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून साजरं करण्यात येत आहे, ही महत्वाची बाब असल्याचे त्यांनी नमुद केले.

ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी, त्यांना बाजारपेठेशी जोडण्यासाठी आणि त्यांच्या उत्पादनांना योग्य मूल्य मिळवून देण्यासाठी उमेद या अभियानाने महत्वाची भूमिका बजावली आहे. या अभियानामुळे ग्रामीण महिलांचे आर्थिक स्वावलंबन, आत्मविश्वास वाढला आहे. त्यामुळे त्यांची समाजात प्रतिष्ठा वाढल्याचे सांगून महिलांच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासन कटिबध्द आहे. महिलांना स्थायी व्यवसाय मिळून त्यातून मोठी बाजारपेठ निर्माण करुन देण्यासाठी राज्य शासनामार्फत भव्य 'उमेद मार्ट' मंजूर झाला असून त्याचे कामही सुरु आहे. त्याचबरोबर जिल्ह्यात २६ पुण्यश्री सुपर मार्केट, ४ पुण्यश्री उपहारगृह, आंबेगाव येथे सावित्री दुकान देखील कार्यरत आहे. पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरही सावित्री दालन आहे. मागील वर्षी जिल्ह्यात १ लाखांहून अधिक लखपती दीदी झाल्या असून मार्च अखेरपर्यंत आणखी ३० हजार महिला लखपती दीदी करण्याचा आमचा निर्धार असल्याचे त्यांनी यावेळी अधोरेखित केले. पुणे जिल्ह्यात उमेद अभियानाअंतर्गत सुमारे २७ हजार स्वयंसहायता समूह असून त्यामध्ये ३ लाखांपेक्षा अधिक महिला सहभागी झाल्या आहेत, या अभियानाच्या माध्यमातून स्वयंसहायता समूहांना १ हजार ६८७ कोटी इतका कर्ज पुरवठा करण्यात आला आहे. राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे जिल्ह्याच्या विकासाचा नेहमीच ध्यास घेतला होता. ग्रामीण भागातील महिलांना स्वावलंबी करण्यासाठी, त्यांना स्वतःच्या पायावर उभं करण्यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले. अनेक योजना राबवल्या आणि अर्थसंकल्पात त्यासाठी भरीव तरतुदी केल्या, जिल्हा नियोजन समितीच्या (डिपीडीसी) माध्यमातून भरघोस निधी दिला. त्यांचा हा विकासाचा वारसा आपल्याला सर्वांना पुढे घेऊन जायचे असल्याचेही यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी सांगितले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानात सरपंच, उपसरपंच आणि अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवावा, चांगली कामगिरी करावी आणि आपल्या गावाचे, तालुक्याचे, जिल्ह्याचे नाव आपण उंचवावे, असे आवाहन श्रीमती पवार यांनी केले. प्रा. कुलकर्णी म्हणाल्या, केंद्र सरकारच्या माध्यमातून महिलाकरिता विविध योजना राबविण्यात येत आहे. प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून ४ कोटी पेक्षा अधिक घरे उपलब्ध करून देण्यात आली असून महिलांच्या नावे घर करुन देण्यात येत आहे. मुद्रा योजनेत ६० टक्के महिला लाभार्थी आहेत. रेल्वे स्थानक, विमानतळावर बचत गटाच्या महिलांकरिता स्टॉल बघायला मिळतात. विदेशात देखील वस्तूला मागणी होत असून त्यांचा कर्तृत्वाचा जागतिक पातळीवर दखल घेतली जात आहे. महिलांच्या उत्पादनाला भाव मिळवून देण्यासाठी 'उमेद मॉल' उभारणीचे काम सुरु आहेत, असेही डॉ. कुलकर्णी म्हणाल्या.

## शिवजयंतीनिमित्त पांडुरंग बलकवडे यांना “शिवराज्य पुरस्कार”

दीपक (बाबा) मिसाळ, नगरसेवक राघवेंद्र बापू मानकर, स्वरदा बापट, स्वप्नाली पंडित, ऐश्वर्या थोरात, मानसी मनोज देशपांडे, स्नेहा नामदेव माळवदे, गणेश कल्याणकर, राजेंद्र काकडे, अजय भोसले, शिरीष मोहिते, राम बांगड, सौरभ बाळासाहेब अमराळे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रतिष्ठानचे अध्यक्ष लतिश शिंदे, उपाध्यक्ष प्रसाद तेलंग, कार्याध्यक्ष प्रशांत मोरे, खजिनदार अविनाश करंजावणे तसेच प्रतिष्ठानच्या सर्व कार्यकर्त्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.

■ रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

पुणे (दै. संध्या) :

सालाबादप्रमाणे यंदाही तिथीनुसार शुक्रवार, दि. ६ मार्च रोजी शिवराज्य प्रतिष्ठान, छत्रपती शिवाजी महाराज रोड, पुणे यांच्या वतीने शिवजन्म सोहळा पारंपरिक व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यंदा प्रतिष्ठानच्या २० व्या वर्षपूर्ती निमित्त ज्येष्ठ इतिहास संशोधक पांडुरंग बलकवडे यांना “शिवराज्य पुरस्कार” देऊन सन्मानित करण्यात आले. मानाची सरदार पगडी, शाल-श्रीफळ व सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते.

इतिहास संशोधन आणि त्याचा प्रसार हेच जीवनध्येय ठेवत कार्य करणारे बलकवडे यांनी नुकतीच वयाची ६६ वर्षे पूर्ण केली आहेत. ते सिंहगड विजेता नरवीर नावजी बलकवडे यांचे वंशज असून भारत इतिहास संशोधक मंडळ, श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ, श्री शिवचरित्र जागर समिती तसेच बालभारती अशा अनेक प्रतिष्ठित संस्थांमध्ये त्यांनी महत्त्वाची पदे भूषविली आहेत. तसेच ते मोडी लिपीचे अभ्यासक म्हणूनही ओळखले जातात. या प्रसंगी बोलताना बलकवडे म्हणाले की, “आजची तरुण पिढी पारंपरिक पद्धतीने शिवजयंती साजरी करत असतानाच सामाजिक भान ठेवून विविध उपक्रम राबवत आहे. माँ जिजाऊंची प्रेरणा घेऊन आजच्या महिला सर्व क्षेत्रांत अग्रेसर होत आहेत. तसेच छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रेरणेने प्रतिष्ठानचे कार्यकर्ते इतिहासाच्या विकृतीकरणाविरुद्ध काम करत आहेत, याचा आनंद वाटतो.” यावेळी प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष आशिष हिंगमिरे यांनी प्रास्ताविक केले. दरवर्षीप्रमाणे शिवजयंतीनिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. तसेच मोफत छातीचा एक्स-रे व विविध आरोग्य तपासण्याही करण्यात आल्या. या



उपक्रमांमध्ये तब्बल २१६ नागरिकांनी सहभाग नोंदवला. शिवराज्य प्रतिष्ठानच्या माध्यमातून आतापर्यंत ६००० हून अधिक रक्तपिशव्यांचे संकलन करण्यात आले आहे. उन्हाळ्यात रक्ताचा तुटवडा भासतो याची जाणीव ठेवून समाजासाठी काहीतरी देण्याच्या भावनेतून प्रतिष्ठान विविध समाजोपयोगी उपक्रम राबवत असल्याचे आयोजकांनी सांगितले. सकाळी ७.३० वाजता शिवछत्रपतींच्या प्रतिमेचे पूजन करून रक्तदान शिबिरास प्रारंभ झाला. रक्तदान करणाऱ्या प्रत्येक रक्तदात्यास भेटवस्तू स्वरूपात “मसाज गन” देण्यात आली. दुपारी १२ वाजता शिवजन्म सोहळा पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. यावेळी प्रतिष्ठानच्या महिला कार्यकर्त्यांनी पेढे वाटून शिवजन्माचा आनंद साजरा केला. यंदा प्रतिष्ठानच्या वतीने “इतिहासाची शौर्यगाथा” या नावाने शिवकालीन नाणी आणि शस्त्रास्त्रांचे विशेष प्रदर्शनही आयोजित करण्यात आले होते. या प्रदर्शनाला शिवभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. तसेच सायंकाळी ७ वाजता बाल-शिवभक्तांसाठी महावतार नरसिम्हा या चित्रपटाचे प्रक्षेपणाचे आयोजन करण्यात आले. मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभाग घेतला आणि अल्पोपहारासह कार्यक्रमाची सांगता झाली. या वेळी परिसरातील मान्यवर आणि नगरसेवकांनी प्रतिष्ठानला भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

## संविधानामुळेच महिलांना सन्मानाचे आयुष्य मिळाले : डॉ. हुलगेश चलवादी



पुणे (दै. संध्या) :

जागतिक महिला दिनानिमित्त चलवादी शिक्षण संस्थेच्या वतीने आज, रविवारी (ता.८) एका विशेष गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. बहुजन नेते व माजी नगरसेवक डॉ.हुलगेश चलवादी, ॲड.रेणुकाताई चलवादी-शिर्के आणि स्वप्नील शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी समाजाच्या विविध क्षेत्रांत योगदान देणाऱ्या चलवादी शिक्षण संस्थेतील मातृशक्तीचा 'भारतीय संविधानाची प्रत' देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे उपस्थित महिलांनी परिधान केलेला 'भगवा फेटा'. या पारंपरिक वेशभूषेमुळे कार्यक्रमात एक वेगळीच ऊर्जा आणि अस्मिता दिसून आली.कार्यक्रमात सत्कारमुर्ती प्राचार्य स्मिता लोंढे, व्यवस्थापक सायली शिंदे, उपप्राचार्य बिना कदम, जयश्री कदम, ज्योती सचदेवा, अश्विनी मोहिते व इतर सर्व शिक्षक, शिकेतर महिला कर्मचारी उपस्थित होत्या.स्नेहभाजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

याप्रसंगी बोलताना डॉ.हुलगेश चलवादी म्हणाले की, "महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून महिलांना खऱ्या अर्थाने जगण्याचा आणि मोकळा श्वास घेण्याचा अधिकार दिला आहे. महिलांनी केवळ चूल आणि मूल यात मर्यादित न राहता, संविधानाने दिलेल्या अधिकारांचा वापर करून आपला विकास साधावा,असे आवाहन त्यांनी यानिमित्ताने केले. सावित्रीमाई, जिजाऊ तसेच रमाई यांनी महिलांना खऱ्या अर्थाने जगण्याची दिशा दाखवनू दिली, असे डॉ.चलवादी म्हणाले. ॲड. रेणुकाताई चलवादी-शिर्के यांनी आपल्या भाषणात महिलांच्या सक्षमीकरणावर भर दिला. त्या म्हणाल्या, "आजची स्त्री ही पुरुषाच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहे. मात्र, आजही अनेक ठिकाणी स्त्रियांना संघर्षाचा सामना करावा लागतो. अशा वेळी संविधानातील तरतुदी आणि कायदे महिलांचे रक्षक म्हणून उभे राहतात. मातृशक्तीने स्वतःच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवून प्रत्येक संधीचे सोने केले पाहिजे.महिलांच्या जीवनात तिचे वडील, भाऊ, पती, मुलगा यांचे स्थान महत्वाचे आहे. त्यांच्या सोबत खांद्याला खांदा लावूनं महिला आपल्या प्रगतीचा मार्ग जोपासू शकते, असे ॲड.रेणुका म्हणाल्या.चलवादी परिवारातील सर्वात छोटी सदस्य 'छकुली'चा हा पहिला महिला दिवस आहे, यानिमित्त त्यांनी आपल्या लेकीला देखील शुभेच्छा दिल्या.

## ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी डिजिटल शिक्षणाची नवी दारे खुली

पुणे (दै. संध्या) :

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडून त्यांचे डिजिटल कौशल्य विकसित करण्याच्या उद्देशाने स्मायलिंग रॉक्स, न्यूयॉर्क या कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी व संस्थापक झुलू घेवरिया यांच्या महत्त्वाकांक्षी डिजिटल ट्रेनिंग आणि रिसोर्स सेंटर (डीटीआरसी) प्रकल्पांतर्गत वाय फोर डी फाउंडेशन, पुणे यांच्या माध्यमातून कोल्हापूर जि.प.प्राथमिक शाळा आकुर्डे व जि.प. प्राथमिक शाळा वाघापूर येथे अत्याधुनिक संगणक कक्षाची उभारणी करण्यात आली आहे. या संगणक कक्षाचे उद्घाटन जि.प.सदस्या सौ.रोहिणीताई आबिटकर यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी अध्यक्षस्थानी आकुर्डे गावाचे सरपंच डॉ.रवींद्र पारकर,मुख्याध्यापक रवींद्र एकळ, जि.प.सदस्या सौ.अर्चना निकम, पंचायत समिती सदस्य एकनाथ जाधव, पंचायत समिती सदस्य विक्रम पाटील,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सागर पवार,शिक्षक, ग्रामस्थ तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या संगणक कक्षाच्या उभारणीत वाय फोर डी फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ.प्रफुल निकम यांचे मोलाचे सहकार्य लाभले असून हा उपक्रम मा.आरोग्यमंत्री प्रकाशराव आबिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. या नव्या संगणक कक्षामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संगणकाचे मूलभूत ज्ञान, डिजिटल साधनांचा वापर तसेच आधुनिक तंत्रज्ञानाशी संबंधित कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळणार आहे.

# ‘स्वस्थ नारी साडी वॉकेथॉन २०२६’ चे आयोजन

पुणे (दै. संध्या) :

महिलांचे कल्याण, उत्साह आणि उर्जेला साजरे करण्यासाठी आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटल, चिंचवड तर्फे आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून ‘स्वस्थ नारी साडी मॅरेथॉन २०२६’ चे आयोजन करण्यात आले होते.




चिंचवड येथील आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटल द्वारे सुरु करण्यात आलेल्या या वॉकेथॉन मध्ये पिंपरी चिंचवड इलाक्यातील विविध वयोगटांतील १५०-१७० महिलांनी भाग घेऊन वातावरण उत्साही केले. या उपक्रमाचे लक्ष्य म्हणजे महिलांनी सकारात्मक जीवनशैलीचा अवलंब करुन त्यांच्या प्रतिबंधात्मक आरोग्याला प्राधान्य देत नियमित आरोग्य तपासणी करावी आणि या मंचाच्या माध्यमातून समाजातील बंध साजरा करणे शक्य व्हावे. या उपक्रमाने महिलांना त्यांच्या कुटुंबाला प्राधान्य देण्याबरोबरच स्वतःच्या आरोग्या कडे लक्ष देणे तितकेच महत्त्वाचे असून त्यांनी प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी करुन स्वतःच्या आरोग्याकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. त्याच बरोबर सहभागी लोकांचा उत्साह आणि प्रतिसाद साजरा करण्याच्या हेतूने हॉस्पिटल तर्फे विशेष पुरस्कारही देण्यात आले. पुरस्कारांचे वितरण हे बेस्ट ट्रॅडिशनल लूक, मोस्ट एनर्जेटिक पार्टिसिपंट आणि सिनियर मोस्ट इन्स्पायरिंग पार्टिसिपंट असे पुरस्कार अतिशय आकर्षक, सुंदर आणि प्रोत्साहक महिलांना देण्यात आले. आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटल चे सीईओ श्री. पामेश गुप्ता यांनी सांगितले “ साधारणपणे महिला त्यांच्या आरोग्याला प्राधान्य देण्यापूर्वी त्यांच्या कुटुंबियांच्या आरोग्याला प्राधान्य देतात. स्वस्थ नारी साडी वॉकेथॉन च्या माध्यमातून आम्ही महिलांना प्रतिबंधात्मक आरोग्या विषयी जागरुक करुन नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व त्यांना समजावून सांगत आहोत. लवकर निदान आणि वेळेत वैद्यकीय मदत मिळाल्याने अनेक आरोग्य समस्यांवर उपचार होऊन अशा प्रकारच्या जागरुकता मोहिमेच्या माध्यमातून महिलांना त्यांच्या आरोग्यावर नियंत्रण मिळवू शकतील.” स्वस्थ नारी साडी मॅरेथॉन च्या माध्यमातून महिलांच्या आरोग्या सह प्रतिकारशक्तीचा आनंद साजरा केला जात असून यांतून आदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटलच्या समाजातील आरोग्य तसेच प्रतिबंधात्मक उपक्रमांचा प्रसार करण्याची वचनबध्दता अधोरेखित होते. अशा उपक्रमांच्या माध्यमातून हॉस्पिटल तर्फे महिलांना त्यांच्या आरोग्याला प्राधान्य देण्यासाठी प्रोत्साहन देऊन त्यातून एकता आणि समाजात त्यांना सक्षम करण्यावर भर दिला जातो.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासमोरील एकात्मिक दुमजली उड्डाणपूल पुणेकरांच्या सेवेत

## वाहतूक कोंडीवर मोठा दिलासा; पायाभूत सुविधांच्या बळावर पुण्याच्या विकासाला गती – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**पुणे (दै. संध्या) :**

पुण्यासारख्या वेगाने विकसित होणाऱ्या शहरासाठी मजबूत पायाभूत सुविधा अत्यावश्यक असून शहराला वाहतूक कोंडीतून मुक्त करण्यासाठी शासनाकडून बहुआयामी नियोजन करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या समोरील एकात्मिक दुमजली उड्डाणपूलाचे लोकार्पण रविवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.



या प्रसंगी उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार, केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, महापौर मंजुषा नागपुरे, आमदार सिद्धार्थ शिरोळे, 'पीएमआरडीए'चे आयुक्त डॉ. योगेश म्हसे, पुणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी पी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, विद्यापीठ चौकातील जुना पूल पाडून नवीन दुमजली उड्डाणपूल उभारण्याचा निर्णय घेताना अनेक अडचणी आणि मतभेद होते; मात्र सर्वांना विश्वासात घेऊन आणि विविध पक्षांच्या नेत्यांचे सहकार्य मिळवून हा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण करण्यात आला. या प्रक्रियेत दिवंगत अजित दादांनी घेतलेला पुढाकार महत्त्वाचा होता, असे त्यांनी नमूद केले.

या प्रकल्पाच्या सुरुवातीच्या काळात काही माध्यमांनी आणि नागरिकांनी टीका केली होती; मात्र शहराच्या दीर्घकालीन हिताचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला होता. या संदर्भात अजित दादा एका भाषणात म्हणाले होते, 'आम्ही अभियंता नाही; मात्र अभियंत्यांनी दिलेल्या आराखड्यानुसार प्रकल्प वेगाने पूर्ण करणे हे आमचे काम आहे,' असे स्पष्टपणे सांगत हा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले आणि आज त्याचे सकारात्मक परिणाम पुणेकरांना दिसत आहेत, असेही त्यांनी सांगितले.

पुणे हे देशातील सर्वात वेगाने विकसित होणाऱ्या शहरांपैकी एक असल्याचे सांगताना मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, माहिती व तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्रातील मोठ्या वाढीनंतर आता पुणे 'ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर्स'चे (जीसीसी) महत्त्वाचे केंद्र बनत आहे. गेल्या वर्षभरात देशातील सर्वाधिक जीसीसी स्पेस पुण्यात विकसित झाली असून त्यामुळे शहराचे आर्थिक व औद्योगिक महत्त्व आणखी वाढले आहे. या विकासाला चालना देण्यासाठी मजबूत पायाभूत सुविधा उभारणे अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

पायाभूत सुविधांच्या कमतरतेमुळे काही मोठ्या शहरांच्या विकासाची गती मंदावल्याची उदाहरणे पाहायला मिळतात. त्यामुळे पुणे शहराला 'डी-कंजेस्ट' करणे हे शासनाचे प्राधान्य असल्याचे त्यांनी सांगितले. पुण्यात रस्त्यांसाठी उपलब्ध जागा मर्यादित असल्याने उड्डाणपूल, ग्रेड सेपरेटर, भुयारी मार्ग आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा विस्तार या माध्यमातून वाहतूक व्यवस्थेचे आधुनिकीकरण करण्यात येत आहे. पुण्यात वाहतुकीसाठी जमिनीवर, आकाशात आणि जमिनीखाली अशा तिन्ही स्तरांवर एकाच वेळी काम सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. यामध्ये पुणे व परिसरासाठी दोन चक्राकार मार्ग (रिंग रोड) प्रकल्प राबविण्यात येत आहेत. तसेच मेट्रोचे जाळे वेगाने विस्तारले जात असून सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड (पीएमपीएल) आणि इतर सेवांना बळ दिले जात असल्याचे श्री. फडणवीस यांनी सांगितले. विद्यापीठासमोरील या उड्डाणपुलाला दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नाव देण्याबाबत व्यक्त झालेल्या भावना मान्य असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस यांनी या संदर्भात सकारात्मक निर्णय घेण्याची ग्वाही दिली. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या , सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासमोरील हा एकात्मिक दुमजली उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला होणे हा पुणे शहरासाठी अत्यंत महत्त्वाचा क्षण आहे. विद्यापीठ मुख्यद्वारा समोर व गणेशखिंड रस्त्यावर होणारी वाहतूक कोंडी ही अनेक वर्षांपासून पुणेकरांसाठी मोठी समस्या होती. या समस्येवर दीर्घकालीन उपाय म्हणून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून हा दुमजली उड्डाणपूल उभारण्यात आला आहे.

### या एकात्मिक दुमजली उड्डाणपूला बद्दल

- उड्डाणपुलाची एकूण लांबी (रॅम्पसह) १७६३.५२ मीटर आहे.
- प्रकल्पाची प्रशासकीय मान्यता किंमत ₹२७७ कोटी आहे.
- औंध, बाणेर, पाषाण आणि शिवाजीनगर या प्रमुख मार्गांना जोडणारी रॅम्प व वाहतूक व्यवस्था करण्यात आली आहे.
- वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी ५५ मीटर लांबीचा स्टील गर्डर बसविण्यात आला आहे.

# स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच संपत्तीवर समान अधिकार मिळायला हवेत

*डॉ. रमेश अवस्थी यांचे प्रतिपादन : सासवड येथे मासूम संस्थेच्यावतीने जागतिक महिला दिन उत्साहात*

**सासवड (दै. संध्या) :**

"हक्क हे पुरुषांनी महिलांना द्यायचे नसून, ते सर्वांना समान आहेत. पितृसत्ताक व्यवस्थेने महिलांना पुढे येऊ दिले नाही, त्यामुळे त्यांना विशेष संधी मिळणे गरजेचे आहे. समाजाचा स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे आणि संपत्तीवर समान अधिकार मिळवण्यासाठी महिलांनी आपला हिस्सा मागितला पाहिजे," असे ठाम प्रतिपादन 'मासूम' संस्थेचे संस्थापक विश्वस्त डॉ. रमेश अवस्थी यांनी केले.

महिला सर्वांगीण उत्कर्ष मंडळ (मासूम) संस्थेच्या वतीने ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त सासवड येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात सासवड नगरपरिषदेपासून निघालेल्या भव्य रॅलीने झाली. या रॅलीतून महिलांच्या हक्कांविषयी घोषणा देत जनजागृती करण्यात आली.

यावेळी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यात आला. आपल्या मुला-मुलींचे आंतरजातीय विवाह करून दिल्याबद्दल संगीता ठवाळ यांचा, तर दलित व वंचित समाजासाठी केलेल्या कामाबद्दल अरुणाताई काकडे यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

सहाय्यक आगार निरीक्षक मोहिनी ढेरे यांनी, २१ व्या शतकातही महिलांवर होणारे अन्याय थांबवण्यासाठी त्यांनी निर्भीडपणे आपले विचार



मांडले पाहिजेत. कॉलेजच्या विद्यार्थिनींच्या सोयीसाठी जादा बस उपलब्ध करून देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

मासूमच्या सहसंयोजक मीना शेंडकर यांनी 'घर दोघांचे' आणि 'शेत दोघांचे' या मोहिमेद्वारे महिलांना मालमत्तेत वाटा मिळवून देण्याचा प्रयत्न सुरू आहे. ७५ वर्षांनंतरही महिलांना हक्कासाठी सामाजिक दबावाचा सामना करावा लागतो, ही खंत त्यांनी व्यक्त केली. अरुणा काकडे यांनी महिलांना स्वावलंबनाचे आवाहन केले, तर प्रा. किशोरी ताकवले यांनी वाचन संस्कृतीतून निर्माण झालेल्या सामाजिक जाणिवेवर भाष्य केले.

कार्यक्रमात मासूमच्या कार्यकर्त्यांनी ज्योती म्हापसेकर लिखित 'मुलगी झाली हो' हे पथनाट्य सादर करून सामाजिक वास्तवावर प्रकाश टाकला. डॉ. अवस्थी यांनी पुढे सांगितले की, मुलींचा प्रवास सुरक्षित व्हावा यासाठी सासवड एस.टी. डेपो कर्मचाऱ्यांचे ट्रेनिंग घेण्यात आले आहे, जेणेकरून छेडछाड करणाऱ्या मुलांना ताकीद मिळेल.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक साधना महामुनी यांनी केले, सूत्रसंचालन कावेरी कुंभारकर यांनी केले आणि आभार योगेश धेंडे यांनी मानले. या कार्यक्रमाला पुरंदर तालुक्यातील ग्रामीण भागातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# मराठी भाषा अभिजात दर्जाचे ५०० कोटी कधी देणार?

**मुंबई (दै. संध्या) :**

तत्कालीन काँग्रेस सरकारने २०१४ साली मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाणांचे कारकिर्दीत 'मराठी भाषेस अभिजात दर्जा देणे बाबत' पाठवलेला प्रस्ताव 'राज्यातील विधानसभा निवडणूकी'च्या तोंडावर मतांच्या अभिलाषेपोटी मंजूर केला खरा मात्र तब्बल १॥ वर्षे उलटूनही मराठी च्या संवर्धनासाठी 'अभिजात दर्जा'चे देणे लागत असलेले ५०० कोटी मात्र अद्यापही केंद्र सरकार कडून देण्याची नियत नसल्याची टीका काँग्रेस'चे वरीष्ठ प्रवक्ते गोपाळदादा तिवारी यांनी केली.

ते पुढे म्हणाले की, मराठी भाषा अभिजात दर्जा मान्य करतांना एकप्रकारे मराठी भाषा स्वतंत्र निर्मित आहे, असे केंद्र सरकारने जाहीर करूनही, पंतप्रधान मोदी यांनी दिल्ली येथील अ भा मराठी साहित्य संम्मेलनाच्या उद्‌घाटन भाषणात मात्र मराठी (स्वतंत्र नसून) संस्कृत भाषेतून निर्माण झाली (?) आहे असे द्व्यार्थी विधान केले, म्हणजे एक प्रकारे मराठी भाषा अभिजात नाही, असेच यातून सुचवायचे होते काय? असा सवाल ही काँग्रेस'नै केला.

अभिजात दर्जा जाहीर झाला तरी, स्वतंत्र उत्कृष्ट अध्ययन केंद्र (Centre of Excellence) स्थापन करण्यासाठी राज्य सरकारने पाठवलेला प्रस्ताव केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडे अद्याप पडून आहे.

कोणतीही भाषा अभिजात घोषित झाली तर केन्द्र सरकारचे सांस्कृतिक मंत्रालय त्या भाषेच्या संवर्धन, विकास आणि अभ्यासासाठी भरीव अनुदान देते, मात्र अभिजात मराठी साठी अद्याप अनुदान दिले नसल्याची वास्तवता आहे.

तसेच महायुती सरकारने २०२४ साली (निवडणूकीपुर्वी) स्वतःचे सांस्कृतिक धोरण घोषित केले. त्यात ऐतिहासिक संपत्ती आणि स्त्रोतांचे संरक्षण यापासून ते सांस्कृतिक विकासामध्ये वाढ अशी १७ उद्दिष्टे घोषित करून, त्याची तत्काळ अंमलबजावणी केली जाईल असे ही घोषीत केले होते.

तसेच संग्रहालये, नाट्यगृहे, ग्रंथालये यांचा विकास करण्यासाठी गुंतवणूक करणे हे सांस्कृतिक धोरणाने मान्य केले होते, मात्र वास्तव हे आहे की तीच ग्रंथालये शासनाच्या उदासीनतेमुळे बंद पडत असून, 'साहित्य संस्कृती'ने शेवटची घटिका मोजणे सुरु केले आहे.

नुकत्याच सादर केलेल्या बजेटमध्येही या ध्येयधोरणाच्या पूर्तीसाठी कसलीही तरतूद केलेली नसल्याची प्रखर टिका ही काँग्रेस ने केली.

# पुणे इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंटचा १६वा दीक्षांत समारंभ




**पुणे (दै. संध्या) :**

पुणे इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट (पीआयबीएम) येथे शनिवारी संस्थेचा १६ वा दीक्षांत समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. भारत सरकारचे संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ हे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. केंद्रीय जल शक्ती राज्य मंत्री राज भूषण चौधरी हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते . चॉईस एएमसी चे उप मुख्य कार्यकारी अधिकारी मनीष जैन व ग्रॅण्ट थॉर्नटन भारत एलएलपी चे भागीदार अंकित चुग, नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, मुबिया इंडिया चे व्यवस्थापकीय संचालक कवलदीप सिंग, शॉपर्स स्टॉप चे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी कवींद्र मिश्रा हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. या प्रसंगी पीआयबीएम चे अध्यक्ष रमणप्रीत यांनी सर्वांचे स्वागत केले. या वेळी बोलताना केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ म्हणाले की, देश २०४७ कडे म्हणजे स्वातंत्र्याच्या १०० वर्षांच्या दिशेने वाटचाल करत असताना आजचे तरुण हेच विकसित भारताचे खरे ब्रँड ॲम्बेसेडर आहेत. भारतात ३० वर्षांखालील ६० कोटींहून अधिक तरुण लोकसंख्या आहे, जी देशाची मोठी ताकद आहे. ही तरुणाई देशाची ऊर्जा, उत्साह आणि प्रेरणा दर्शवते. सध्याच्या विकासाच्या गतीमुळे भारत प्रगतीच्या अटळ मार्गावर आहे, असे त्यांनी नमूद केले. दिल्लीमध्ये नुकत्याच झालेल्या एआय परिषद हे अत्यंत महत्त्वपूर्ण पाऊल होते . कृत्रिम बुद्धिमत्ता मुळे नोकऱ्या कमी होतील हा दृष्टीकोन दूर करण्यात या परिषदेमुळे मदत झाली.

## आय.ए.ए.पी.आय. करमणूक प्रदर्शन 2026 भारताच्या करमणूक उद्योगाला चालना देण्यासाठी सज्ज

पुणे (दै. संध्या) : इंडियन असोसिएशन ऑफ अम्युझमेंट पार्क्स अँड इंडस्ट्रीज (आय. ए. ए. पी. आय.) ने मुंबईतील गोरेगाव येथील बॉम्बे एक्झिबिशन सेंटर (बी. ई. सी.) येथे 10 ते 12 मार्च 2026 दरम्यान होणाऱ्या आय. ए. ए. पी. आय. अम्युझमेंट एक्स्पोच्या 24 व्या आवृत्तीची अभिमानाने घोषणा केली. या प्रदर्शनास भारत सरकारच्या पर्यटन मंत्रालयाने 'अतुल्य भारत' या झेंड्याखाली आणि तेलंगणा पर्यटन आणि मध्य प्रदेश पर्यटन हे भागीदार राज्य म्हणून पाठबळ दिले आहे. करमणूक, विश्रांती आणि करमणूक उद्योगासाठी भारताचे प्रमुख बी2बी प्रदर्शन म्हणून ओळखले जाणारे, या वर्षीचा महत्त्वाचा कार्यक्रम, करमणुकीच्या भविष्याला आकार देण्यासाठी जागतिक नेते, नवप्रवर्तक आणि प्रमुख भागधारकांना एकत्र आणणारा, आतापर्यंतचा सर्वात गतिमान मेळावा असल्याचे वचन देतो. 15,000 चौरस मीटरच्या भव्य प्रदर्शन जागेत पसरलेला हा तीन दिवसीय कार्यक्रम मनोरंजन आणि थीम पार्क क्षेत्रासाठी आशियातील एकमेव केंद्रित तंत्रज्ञान शो म्हणून काम करतो.

# केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते IFFCO परादीप युनिटमधील सल्फ्युरिक ॲसिड प्लांट–३ राष्ट्राला समर्पित

नवी दिल्ली (दै. संध्या) : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते इंडियन फार्मर्स फर्टिलायझर कोऑपरेटिव्ह लिमिटेड (IFFCO) च्या परादीप युनिटमधील नव्याने उभारण्यात आलेल्या सल्फ्युरिक ॲसिड प्लांट–३ (SAP–III) चे राष्ट्राला समर्पण करण्यात आले. या प्रकल्पामुळे भारतातील खत उत्पादन पायाभूत सुविधांना बळकटी मिळणार असून शेतकरी समुदायाला मोठा लाभ होणार आहे. सुमारे ७०० कोटी रुपयांच्या खर्चातून उभारण्यात आलेल्या या प्रकल्पाची दररोजची उत्पादन क्षमता सुमारे २,००० मेट्रिक टन आहे. या प्रकल्पामुळे परादीप संकुलाची कार्यक्षमता मोठ्या प्रमाणात वाढणार असून हे संकुल देशातील सर्वात मोठ्या एकात्मिक फॉस्फेटिक खत उत्पादन केंद्रांपैकी एक मानले जाते. या समर्पण सोहळ्यास ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी, केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान, IFFCO चे अध्यक्ष दिलीप संघाणी, व्यवस्थापकीय संचालक के. जे. पटेल



यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. याशिवाय संसद सदस्य, राज्यातील मंत्री, भारत सरकार व ओडिशा सरकारचे वरिष्ठ अधिकारी तसेच सहकार क्षेत्रातील प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यात सहकार क्षेत्राची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे सांगितले. IFFCO सारख्या संस्थांनी देशातील लाखो शेतकऱ्यांना सक्षम बनविण्यात मोठे योगदान दिले असल्याचे त्यांनी नमूद केले. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने खत उत्पादन वाढवल्यास शेतकऱ्यांना आवश्यक कृषी घटक वेळेवर उपलब्ध होतील आणि कृषी क्षेत्राची उत्पादकता वाढेल, असेही त्यांनी सांगितले.

ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी यांनी सांगितले की, परादीप येथे नव्या प्रकल्पामुळे राज्यातील औद्योगिक विकासाला चालना मिळेल. अशा प्रकल्पांमुळे गुंतवणूक वाढण्याबरोबरच स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी IFFCO च्या परादीप संकुलाच्या विस्तारामुळे देशाची खत उत्पादन क्षमता अधिक मजबूत होईल आणि शेतकऱ्यांना वेळेवर खत उपलब्ध होण्यास मदत होईल, असे मत व्यक्त केले. IFFCO चे अध्यक्ष दिलीप संघाणी यांनी सांगितले की, शेतकऱ्यांची सेवा आणि सहकार चळवळीला बळकटी देणे हेच संस्थेचे उद्दिष्ट असून सल्फ्युरिक ॲसिड प्लांट–३ हे आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराचे प्रतीक आहे. IFFCO चे व्यवस्थापकीय संचालक के. जे. पटेल यांनी सांगितले की, हा प्रकल्प अत्याधुनिक आणि पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर करून उभारण्यात आला असून यामुळे परादीप युनिटची उत्पादन क्षमता आणि कार्यक्षमता वाढेल.

या कार्यक्रमाला बिभू प्रसाद तराई, अमरेंद्र दास, संपद चंद्र स्वैन तसेच सहकार सचिव आशीष कुमार भुतानी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

या प्रकल्पाच्या सुरूवातीमुळे IFFCO च्या परादीप युनिटची क्षमता वाढून देशातील खत उत्पादन प्रणाली अधिक मजबूत होणार असून शेतकऱ्यांना खतांची उपलब्धता सुधारण्यास मदत होईल. तसेच 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेला यामुळे मोठी चालना मिळणार आहे.


- महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६
  मंजूर विकास योजनेतील आरक्षित क्षेत्र संबंधित जमिन मालकाने नियोजन प्राधिकरणास हस्तांतरित केले असल्यास व अशा जमिनीवर त्रयस्थ व्यक्तीने / विकासकाने (Third Party /Developer) संबंधित आरक्षणाचे / विकास योजना रस्त्याखालील क्षेत्राचा विकास केल्यास त्याबदल्यात संबंधित विकासकास Construction Amenity TDR देण्याची नवीन तरतुद मंजूर एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीतील (UDCPR) विनियम क्र.११.२.५ मध्ये समाविष्ट करण्यासंदर्भात म.प्रा.नि. व न.र. अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१कक) (क) अन्वये सूचना...
- उक्त अधिनियमाचे कलम १५४ (१) खालील निदेश

**सूचना**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : १६.०२.२०२६**

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६*

**क्र. टिपीएस-१८२४/अनौसं-५२/प्र.क्र.१५७/२०२५/नवि-१३:-** ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका, व अन्य काही नियोजन प्राधिकरणे वगळता उर्वरित सर्व नियोजन प्राधिकरणे व प्रादेशिक योजना क्षेत्रांकरीता लागु करावयाच्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीस ("यापुढे जिचा उल्लेख "उक्त नियमावली" असा करण्यात आलेला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात आलेला आहे) मधील तरतुदीनुसार, शासन अधिसूचना क्र. टिपीएस-१८१८/प्र.क्र.२३६/१८/वि.यो. व प्रायो./ कलम ३७ (१कक) (ग) व कलम २० (४)/नांव-१३. दि.०२/१२/२०२० अन्वये मंजुरी दिली आहे;

आणि ज्याअर्थी, आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांनी, शासनास स्पर्धात्मक निविदा राबवून निवडण्यात आलेल्या खाजगी विकासकामार्फत, मौजा नारी, खसरा क्रमांक १०९-११०/२,३ (भाग) या जागेवर उक्त महानगरपालिकेत कार्यरत सफाई कर्मचाऱ्यांसाठी गृहनिर्माण प्रकल्प राबविण्याकरिता उक्त विकासकास हस्तांतरीत विकास हक्क' हे टप्पेनिहाय मोबदला (Stage wise Construction TDR) स्वरूपात व उक्त नियमावलीमधील विनियम क्र.११.२.५ मधील नमूद तरतूदीचे मर्यादित Construction TDR दंऊन उक्त प्रकल्प उक्त महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये राबविण्यासाठी मान्यता प्रदान करण्याची विनंती दिनांक १९.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये शासनास केलेली आहे;

आणि ज्याअर्थी, नागपूर महानगरपालिकेच्या उक्त विनंतीस अनुसरुन तसेच संचालक, नगर रचना महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडोल प्राप्त अहवालानुसार व सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातून उक्त नियमावलीमधील विनियम क्र.११.२.५ या विनियमामध्ये या सूचनेसोबतच्या "परिशिष्ट-अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे नवीन तरतुद समाविष्ट करणे आवश्यक आहे असे शासनाचे मत झाले आहे (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त फेरबदल" असा करण्यात आलेला आहे) :

आता त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१क क) (क) अन्वये प्राप्त अधिकारात आणि तनुषंगिक शक्तीचा वापर करुन, उक्त फेरबदलावर जनतेकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी शासन ही सूचना प्रसिध्द करीत आहे. उक्त फेरबदलावरील कोणत्याही सूचना / हरकती, ही सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत, संबंधित विभागीय सहसंचालक, नगर रचना यांचेकडे दाखल करता येतील. विभागीय सहसंचालक, नगर रचना यांना प्राप्त सूचना/हरकतीवर सुनावणी देऊन आणि आवश्यकतेनुसार संबंधित नियोजन प्राधिकरणांचे म्हणणे घेऊन, त्यावरील अहवाल शासनास सादर करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

ही सूचना, कामकाजाचे दिवशी एक महिन्याच्या कालावधीकरीता जनतेच्या अवलोकनार्थ खालोल कार्यालयात उपलब्ध राहील.

१) विभागीय सहसंचालक, नगर रचना, कोकण / पुणे / नाशिक / नागपूर / अमरावती / छत्रपती संभाजीनगर विभाग,
२) आयुक्त, सर्व संबंधित महानगरपालिका. (बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता)
३) जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे.
४) महानगर आयुक्त, सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे.
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण, निगडी, पुणे.
६) उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी लि. मुंबई.
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, कोल्हापूर नागरी क्षेत्र विकास प्राधिकरण, कोल्हापूर.
८) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हापरिषदा.
९) मुख्याधिकारी (सर्व नगरपरिषदा / नगरपंचायती)

तसेच, शासन याद्वारे उक्त अधिनियमाचे कलम १५४ (१) अन्वये नव्याने निदेश देत आहे की, उक्त अधिनियमाचे कलम ३७ (१कक) चे उपकलम (ग) अन्वये प्रस्तावित फेरबदलास शासनाची अंतिम मान्यता प्रलंबित असेपर्यंत प्रस्तावित फेरबदल व त्यामधील तरतुदी राज्यस्तरावर लगोलग अंमलात येतील.

ही सूचना/निदेश शासनाचे संकेतस्थळ www.maharashtra.gov.in (कायदे / नियम) वर उपलब्ध राहील.

***महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,***

शिक्का

**सही/-**
**(प्रणव कर्पे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**विमाका/पुणे/जाहि./३५५/२०२५-२६**

## थोडक्यात पण महत्वाचे...



### आळंदीतील आध्यात्मिक शिक्षण संस्थेवर बंदी; 47 बालकांचे पुनर्वसन

आळंदी (दैनिक संध्या) : आळंदी येथील जाहुरकर महाराज आध्यात्मिक शिक्षण संस्थेवर बंदीची कारवाई करण्यात आली आहे. या संस्थेतील 47 बालकांचे शासकीय बालगृहात पुनवर्सन केल्याची माहिती मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी दिली. या संस्थेत आध्यात्मिक शिक्षण घेणाऱ्या 12 वर्षीय मुलीवर शारीरिक व मानसिक शोषण झाल्याचे उघडकीस आले आहे. याबाबत गुन्हा देखील दाखल झाला आहे. यावर तातडीने दखल घेत या संस्थेवर बंदीची कारवाई केली. संस्थेतील 43 मुले व 4 मुलींना तीन शासकीय बालगृहांमध्ये सुरक्षितपणे हलविण्यात आले आहे. मुख्याधिकारी खांडेकर यांच्या नेतृत्वात शनिवारी (दि. 7) सकाळी 11 वाजता नगरपरिषद अधिकारी, आळंदी दामिणी महिला पोलिस पथक आणि जिल्हा बाल संरक्षण कक्षाचे अधिकारी यांनी संस्थेची प्रत्यक्ष पाहणी केली. या पाहणीत त्यांना अनेक गंभीर त्रूटी निदर्शनास आल्या. महिला व बालविकास विभागाच्या 3 जुलै 2025 च्या शासन निर्णयानुसार अनधिकृत व नियमभंग करणाऱ्या संस्थांवर कारवाई करण्याचे अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहेत. त्या अधिकाराचा वापर करत संस्था तत्काळ बंद करण्याचे आदेश देण्यात आले. या कारवाईत मुख्याधिकारी माधव खांडेकर यांच्या समवेत आळंदीचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक भीमा नरके, नगरपरिषद कर व प्रशासकीय सेवा विभाग सीमा चारभे, लेखापरीक्षक प्रदीप आवारी, सहायक प्रकल्प अधिकारी वैशाली पाटील, अभियंता मिथिल पाटील, कर्मचारी नाना घुंडरे, आळंदी पोलिस दामिणी पथकाच्या पूजा नाईक, श्वेता शेलकर, समुदाय संघटक अर्जुन घोडे, बाल संरक्षण अधिकारी शत्रुघ्न खोकले, पोलिस कर्मचारी मच्छिंद्र शेंडे उपस्थित होते.

### अवैध गौणखनिज वाहतुकीवर कारवाई




आंबेगाव (दैनिक संध्या) : आंबेगाव तहसील कार्यालयाने अवैध गौणखनिज वाहतुकीविरोधात कठोर मोहीम सुरू केली आहे. यादरम्यान दोन डंपरविरोधात कारवाई करण्यात आली आहे. तहसीलदार डॉ. सचिन वाघ यांनी याबाबत माहिती दिली. तालुक्यातील विविध भागांत अवैध माती, मुरूम व वाळू वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष पथके कार्यरत करण्यात आली आहेत. तहसील कार्यालयाच्या वतीने सहा मंडळांमध्ये सहा प्रतिबंधक पथके स्थापन करण्यात आली आहेत. आंबेगाव मंडळ (पेसा क्षेत्र), निरगुडसर मंडळ-पारगाव मंडळ परिसरात तपासणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान अवैध माती व मुरूम वाहतूक करणाऱ्या दोन डंपरवर कारवाई करण्यात आली. तपासणीदरम्यान दोन डंपरमधून अवैध गौणखनिज वाहतूक होत असल्याचे आढळून आले. संबंधित वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. तालुक्यातील विविध भागांत अवैध खनिज उत्खनन व वाहतुकीच्या तक्रारी येत असल्याने महसूल प्रशासनाने ही मोहीम अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेतला आहे. नागरिकांनीही अवैध वाळू, माती किंवा मुरूम वाहतूक होत असल्याची माहिती तत्काळ तहसील कार्यालयाला द्यावी, असे आवाहन केले आहे. तक्रार करणाऱ्यांचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव; 'मलवाझी' ठरला सर्वोत्कृष्ट चित्रपट


पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात केरळ राज्यातील मल्याळम भाषेतील 'मलवाझी' या चित्रपटाने सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा मान पटकावला. मराठी भाषेतील अ स्टोरी कार्वेड ऑन अ ट्री या लघुपटाने सर्वोत्कृष्ट लघुपट पुरस्कार पटकावला. ॲनिमेशन विभागात राजस्थान येथील द वेट वॉल या चित्रपटाने सर्वोत्कृष्ट ॲनिमेशन फिल्मचा मान मिळवला. सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार दुलाल रॉय व प्रणव जोशी यांना, सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार मिथिला हिरेमठ यांना प्रदान करण्यात आला.आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजलेल्या साबर बोंड या चित्रपटाचे दिग्दर्शक रोहण कानवडे यांना सिने आयकॉन पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. महोत्सवात भारतासह जर्मनी, इटली, स्पेन, पोलंड, ब्राझिल, युएई यासह 43 देशांमधील 116 पेक्षा अधिक चित्रपट, लघुपट, माहितीपट, ॲनिमेशन चित्रपट व 60 सेकंदांचे चित्रपट प्रदर्शित करण्यात आले. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सहकार्याने महोत्सव आकुर्डी येथील ग. दि. माडगुळकर नाट्यगृहात पुरस्कार वितरण समारंभ झाला. या वेळी उपमहापौर शर्मिला बाबर, क्रीडा समिती सभापती कैलास कुटे, नगरसेविका प्रियंका कुदळे, उपायुक्त पंकज पाटील, विशेष अधिकारी किरण गायकवाड, चित्रपट निर्माते नितीन वैद्य, अभिनेते श्रीकांत यादव, दिग्दर्शक तेजस देऊसकर, अभिनेते इनाम उल हक, दिग्दर्शक रोहन कानवडे, गोरख कातोरे, सोमनाथ शितोळे, डॉ. पांडुरंग भोसले, चित्रपट समीक्षक नरेंद्र बंडाबे, श्रीकांत आगवणे, मोदीत सिंघल, पल्लवी सिंघल आदी उपस्थित होते. चैतन्य कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. महोत्सवात क्रांतिज्योती विद्यालय-मराठी माध्यम या चित्रपटाला नागरिकांचा प्रतिसाद लाभला.

### पिंपरी-चिंचवडमध्ये पहिले कॅन्सर रुग्णालय; थेरगावमध्ये 10 मजली इमारत

पिंपरी (दैनिक संध्या) : पिंपरी-चिंचवड शहरातील सर्वसामान्य तसेच, गोरगरीब रुग्णांसाठी महापालिकेच्या वतीने थेरगाव येथील नवीन रुग्णालयाशेजारील मोकळ्या जागेत कर्करोग (कॅन्सर) रुग्णालय उभारण्यात येत आहे. दहा मजली इमारतीमध्ये एकूण 100 बेड असणार असून, अद्ययावत अशी उपचार सुविधा दिली जाणार आहे. त्यासाठी संबंधित संस्थेला नुकतीच वर्कऑर्डर देण्यात आली आहे. येत्या दोन वर्षांत इमारत बांधून, प्रत्यक्ष रुग्णसेवा सुरू केली जाणार आहे. महापालिकेच्या वतीने सार्वजनिक-खासगी भागीदारीतून डिझाईन, बिल्ड, फायनान्स, ऑपरेट (डीबीएफओटी) तत्त्वावर कॅन्सरचे अत्याधुनिक रुग्णालय उभारले जाणार आहे. ते महापालिकेचे कॅन्सरचे पहिले रुग्णालय असणार आहे. वैद्यकीय विभागाच्या त्या प्रस्तावाला आयुक्तांनी 1 मार्च 2024 ला मान्यता दिली. त्यासाठी 12 मार्च 2024 ला निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. त्याला प्रतिसाद न मिळाल्याने पुन्हा निविदा प्रसिद्ध करण्यात आली. 11 नोव्हेंबर 2024 च्या निविदेत पात्र ठरलेल्या आपुलकी हेल्थकेअर प्रा. लि. या संस्थेला ते काम 30 वर्षांसाठी देण्यात आले. त्याला आयुक्तांनी 15 डिसेंबर 2025 ला मान्यता दिली. त्यानुसार, करारनामा करण्यात आला आहे. तसेच, कामाची वर्कऑर्डर त्या संस्थेला 30 जानेवारी 2026 ला देण्यात आली आहे. त्यामुळे लवकरच प्रत्यक्ष काम सुरू केले जाणार आहे. थेरगाव रुग्णालयाशेजारील 34 हजार 848 चौरस फूट जागेत रुग्णालयासाठी 10 मजली सुसज्ज इमारत बांधण्यात येणार आहे. ते काम दोन वर्षांत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी महापालिकेकडून व्हॅबिलिटी गॅप फंड म्हणून संस्थेला 60 कोटी 6 लाख रुपये देण्यात आले आहेत.

# पोस्ट ऑफिस कार्यालयाचे लवकरच उद्‌घाटन

**नाना काटे यांच्या पाठपुराव्याला यश**




पिंपरी (दै. संध्या) :

रहाटणी-पिंपळे सौदागर या प्रभागाचा झपाट्याने विकास झाला असून येथील लोकसंख्या एक लाखांहून अधिक आहे. या परिसरात मोठ्या प्रमाणावर सहकारी गृहनिर्माण संस्था असून विविध खासगी व सरकारी कार्यालये, शाळा आणि महाविद्यालये देखील आहेत. मात्र पोस्ट ऑफिससंबंधित कामासाठी येथील नागरिकांना चिंचवड किंवा औंध, पुणे येथे जावे लागत होते. ही गैरसोय लक्षात घेऊन माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी पोस्ट ऑफिस सुरू करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे शिवार चौक येथे २०१० साली टपाल पेटी बसविण्यात आली तसेच दर सोमवारी कुणाल आयकॉन रोड येथे पोस्ट ऑफिसची फिरती गाडी उपलब्ध करून देण्यात आली. परंतु जेष्ठ नागरिक किंवा महिला यांना अनेक समस्याला सामोरे जावे लागत होते ही बाब विचारात घेता, पिंपळे सौदागर परिसरातील नागरिकांची वाढती मागणी लक्षात घेऊन नाना काटे यांनी पोस्ट ऑफिस सुरू करण्यासाठी वेळोवेळी पत्रव्यवहार व पाठपुरावा सुरूच ठेवला. त्यांनी परिसरातील विविध खासगी व सरकारी जागा तसेच गाळे सुचवून तेथे पोस्ट ऑफिस सुरू करण्याबाबत विनंतीपत्रे दिली व प्रत्यक्ष भेटूनही सूचना केल्या. या संदर्भात त्यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचीही भेट घेऊन मदत मागितली. अजितदादा पवार यांनी देखील याची दखल घेत प्रशासन स्तरावर पाठपुरावा करून आवश्यक सहकार्य केले. नाना काटे यांनी २०१७ पासून सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे दिल्ली व पुणे येथील पोस्ट ऑफिस प्रशासनाने पिंपळे सौदागर येथे पोस्ट ऑफिस सुरू करण्यास सहमती दर्शविली. त्यानुसार २०२३ पासून पोस्ट ऑफिससाठी आवश्यक कागदपत्रे व जागेची माहिती नाना काटे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने पोस्ट ऑफिस विभागाला देण्यात आली. त्यानुसार पिंपळे सौदागर गावठाण येथील हनुमान मंदिरावरील हॉल पोस्ट ऑफिससाठी देण्यास महापालिकेने मान्यता दिली.

पोस्ट ऑफिस हे सामान्य नागरिकांच्या सोयीसाठी असल्या मुळे त्याचे वार्षिक भाडे कमी असावे तसेच मिळकत करात सवलत देण्यात यावी, अशी विनंतीही मा. अजितदादा पवार यांच्याकडे करण्यात आली होती. त्यांच्या सूचनेनुसार महापालिकेने सकारात्मक प्रतिसाद देत भारतीय पोस्ट विभागाच्या धोरणानुसार वार्षिक भाडे निश्चित केले. या पाठपुराव्याचे पुढील पाऊल म्हणून पिंपळे सौदागर येथील मंजूर पोस्ट ऑफिससाठी नवीन पिन कोड ४११०८३ देखील मंजूर करण्यात आला. कोणताही गाजावाजा न करता किंवा श्रेय न घेता नाना काटे यांनी नागरिकांच्या सोयीसाठी हा पाठपुरावा सातत्याने सुरू ठेवला. काही दिवसांतच दिवंगत उपमुख्यमंत्री मा. अजितदादा पवार यांच्या हस्ते या पोस्ट ऑफिसचे उद्‌घाटन करण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र त्यांच्या निधनामुळे हा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला. आता लवकरच या पोस्ट ऑफिसचे उद्‌घाटन करण्यात येणार आहे अशी माहिती नाना काटे यांनी दिली आहे.

## पुणे आणि पिंपरी-चिंचवड मेट्रोमध्ये महिला व ज्येष्ठांसाठी राखीव जागा

पिंपरी (दै. संध्या) :

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महाराष्ट्र मेट्रो कॉर्पोरेशन (महामेट्रो) च्या प्रवासात महिला आणि ज्येष्ठांसाठी राखीव जागा नसल्याने त्याची मोठी गैरसोय होत होती. या पार्श्वभूमीवर महिला आणि ज्येष्ठांकडून राखीव जागा ठेवण्याची मागणी करण्यात आली होती. ही मागणी लक्षात घेत मेट्रो व्यवस्थापनाने मेट्रोच्या तिन्ही डब्यांत महिला व ज्येष्ठांसाठी राखीव जागा ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. जागतिक महिला दिन ८ मार्चपासून हा निर्णय लागू करण्यात करण्यात येणार असल्याची माहिती पुणे मेट्रोकडून देण्यात आली आहे. वनाझ ते रामवाडी आणि पिंपरी चिंचवड ते स्वारगेट या मार्गावर सध्या मेट्रो धावत आहे. पिंपरी, संत तुकाराम नगर, भोसरी, (नाशिक फाटा), कासारवाडी, फुगेवाडी, दापोडी, बोपोडी, असे एकूण सहा थांबे आहेत. मेट्रोमधून सध्या दोन लाखांपेक्षा जास्त प्रवासी प्रवास करतात. यामध्ये महिला आणि ज्येष्ठ नागरिकांची संख्या जास्त प्रमाणात आहे. त्यामुळेच पुणे मेट्रोच्या प्रत्येक ट्रेनमधील तिन्ही डब्यांमध्ये महिला आणि ज्येष्ठांसाठी विशेष आसन व्यवस्था करण्यात आली आहे. या संदर्भात वृत्त प्रसिध्द करण्यात आले होते.

या वृत्ताची महामेट्रो व्यवस्थापकाने दखल घेत ज्येष्ठ आणि महिलांसाठी राखीव आसन करण्याचा निर्णय घेतला आहे.

## २० बिबट्यांचे गुजरातमधील 'वनतारा' केंद्रात स्थलांतर




पिंपरी (दै. संध्या) :

पुणे जिल्ह्यातील जुन्नर वनविभागाच्या हद्दीत मागील काही वर्षांत मानव-बिबट संघर्षाच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने पकडण्यात आलेल्या बिबट्यांचे स्थलांतर करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार (७ मार्च) पहिल्या टप्प्यात माणिकडोह बिबट निवारा केंद्रातील २० बिबट्यांना गुजरातमधील 'वनतारा' केंद्रात हलविण्यात आले. मानव-बिबट संघर्षाच्या पार्श्वभूमीवर जुन्नर व शिरूर तालुक्यातील काही बिबट्यांना पकडून त्यांना माणिकडोह बिबट निवारा केंद्रात ठेवण्यात आले होते. मात्र या केंद्राची क्षमता केवळ ५० बिबट्यांची असल्याने अतिरिक्त बिबट्यांचे इतर योग्य ठिकाणी स्थलांतर करणे आवश्यक झाले होते. यासाठी प्रस्ताव सेंट्रल झू ऑथॉरिटी, नवी दिल्ली यांच्याकडे पाठविण्यात आला होता. या प्रस्तावाला २० डिसेंबर २०२५ रोजी मंजुरी मिळाल्यानंतर पुढील प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. गुजरातमधील ग्रीन्स झूलॉजिकल रेस्क्यू ॲण्ड रिहॅबिलिटेशन सेंटर येथील २५ सदस्यीय पथक पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. गौरव श्रीवास्तव यांच्या नेतृत्वाखाली ६ मार्च रोजी जुन्नर येथे दाखल झाले. त्यानंतर आज पहिल्या टप्प्यात १० नर आणि १० मादी अशा एकूण २० बिबट्यांना वातानुकूलित व सुसज्ज रेस्क्यू व्हॅनद्वारे सुरक्षितपणे वनतारा केंद्रात रवाना करण्यात आले. ही संपूर्ण प्रक्रिया वन्यजीव विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. तसेच जुन्नर वनविभागातील अधिकारी-कर्मचारी आणि वाइल्डलाइफ SOS संस्थेच्या सहकार्याने स्थलांतराची मोहीम यशस्वी करण्यात आली. मानव-वन्यप्राणी संघर्ष कमी करण्यासाठी वनविभागाकडून विविध उपाययोजना राबविण्यात येत असून नागरिकांनीही सहकार्य करावे, असे आवाहन वनविभागाने केले आहे.

## गरजू नागरिकांसाठी 'महापौर वैद्यकीय आर्थिक सहाय्य योजना' सुरू

**गंभीर आजार व शस्त्रक्रियांसाठी मिळणार आर्थिक मदत; महापौर कार्यालयामार्फत अर्ज करून मिळणार योजनेचा लाभ**




> "शहरातील गरजू नागरिकांना वेळेवर उपचार मिळावेत आणि आर्थिक अडचणीमुळे कोणालाही वैद्यकीय सेवा नाकारावी लागू नये, यासाठी महापालिकेच्या माध्यमातून ही योजना सुरू करण्यात आली आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना उपचारासाठी मदत मिळावी आणि त्यांना दिलासा मिळावा हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे."
> **– रवी लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नागरिक सार्वजनिक चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून शहरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल नागरिकांना वैद्यकीय उपचारांसाठी मदत मिळावी या उद्देशाने 'महापौर वैद्यकीय आर्थिक सहाय्य योजना' सुरू करण्यात आली आहे. यामध्ये गंभीर आजार, उपचार किंवा शस्त्रक्रिया करण्यासाठी अडचणीत असलेल्या नागरिकांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

महापौर रवी लांडगे आणि स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या पुढाकारातून सुरू करण्यात आलेल्या या योजनेअंतर्गत गरजू रुग्णांना त्यांच्या उपचारासाठी रुग्णालयाच्या नावाने धनादेशाद्वारे आर्थिक मदत दिली जाणार आहे. यामुळे उपचारासाठी आवश्यक असलेला आर्थिक भार काही प्रमाणात कमी होऊन नागरिकांना वेळेवर उपचार घेणे शक्य होणार आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी रुग्ण किंवा त्याच्या कुटुंबातील सदस्यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या महापौर कार्यालयात अर्ज सादर करणे आवश्यक आहे. अर्जासोबत पुढील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

- रुग्णाचे आधारकार्ड (सत्यप्रत)
- रेशनकार्डाची प्रत
- तहसीलदार कार्यालयाकडील उत्पन्नाचा दाखला
- स्थानिक नगरसेवकांचे शिफारसपत्र
- रुग्णालयाकडून देण्यात आलेले उपचार खर्चाचे अंदाजपत्रक (डॉक्टरांच्या सही व शिक्क्यासह)

योजनेचा लाभ मिळविण्यासाठी अर्जामध्ये नमूद केलेली माहिती अचूक असणे आवश्यक असून कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतरच आर्थिक सहाय्य मंजूर केले जाईल. अर्ज मंजूर झाल्यानंतर संबंधित रुग्णालयाच्या नावाने धनादेशाद्वारे आर्थिक मदत दिली जाईल.

## मालमत्ताकर अभय योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद

पिंपरी (दै. संध्या) :

- **विलंब दंडात ९०% सवलतीमुळे सहा दिवसांत सुमारे २० कोटींचा भरणा; ७,४०० थकबाकीदारांना दिलासा**

पिंपरी-चिंचवड शहरातील थकबाकीदारांना मालमत्ताकारांना बिले भरता यावीत म्हणून विलंब दंडात तब्बल 90 टक्क्यांची सवलत देण्यात आली आहे. त्या अभय योजनेला थकबाकीदारांकडून मोठा प्रतिसाद मिळत आहे. योजना सुरू झाल्यापासून महापालिका तिजोरीत तब्बल 20 कोटी रुपयांचा भरणा झाला आहे. तर, तब्बल 7 हजार 400 थकबाकीदारांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे. शहरातील 2 लाख 12 हजार 440 मालमत्ताधारकांनी 28 फेब्रुवारीपर्यंत मालमत्ताकर भरलेला नव्हता. थकीत मालमत्ताकर वसुलीस गती देण्यासाठी 1 मार्चपासून महापालिकेच्या करसंकलन विभागाकडून अभय योजना सुरू करण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत निवासी, बिगरनिवासी, औद्योगिक व मोकळ्या जागा यांची थकबाकी एकरकमी भरल्यास विलंब दंडावर 90 टक्के सवलत दिली जात आहे. ती योजना 31 मार्चपर्यंत आहे. त्या 2 लाख 12 हजार 440 मालमत्ताधारकांनी बिल भरलेले नाही. निवासी मालमत्ता सर्वाधिक 1 लाख 80 हजार 27 इतक्या असून, थकबाकी तब्बल 404 कोटी 75 लाख इतकी आहे. तर, बिगरनिवासी 18 हजार 284 मालमत्ताधारकांकडे एकूण 341 कोटी 58 लाखांची थकबाकी आहे. पाच हजार 233 मिश्र मालमत्ताधारकांकडे 5 हजार 233, एक हजार 341 औद्योगिक मालमत्ताधारकांकडे 18 कोटी 2 लाख, पाच हजार 308 मोकळ्या जमीनधारकांकडे एकूण 374 कोटी 41 लाख आणि इतर 247 जणांकडे 40 लाखांची थकबाकी आहे.

# 'अटल महाआरोग्य शिबिर' आरोग्य सेवेचे रोल मॉडेल

**डॉ. ओमप्रकाश शेटे : जनसेवेचे मिशन अखंड चालविणाऱ्या आमदार शंकर जगताप यांचे कार्य कौतुकास्पद**

पिंपरी (दै. संध्या) :

- **आयुष्यमान भारत मिशनकरिता पुणे-पिंपरी चिंचवडसाठी स्वतंत्र 'कंट्रोल रूम'**




"राज्यातील सामान्य आणि गरजू रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा मोफत मिळवून देण्यासाठी 'आयुष्मान भारत मिशन' आणि 'मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी' हे मोठे आधारवड ठरत आहेत. पिंपरी-चिंचवडमधील हे 'अटल महाआरोग्य शिबिर' केवळ एक उपक्रम नसून, ते खऱ्या अर्थाने जनसेवेचे मिशन आहे. या सेवेचा वसा घेऊन आमदार शंकर जगताप आणि त्यांचे सहकारी स्वर्गीय लक्ष्मणभाऊ जगताप यांचा आरोग्य सेवेचा वारसा अत्यंत प्रामाणिकपणे पुढे नेत आहे," असे गौरवोद्गार आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी शनिवारी काढले.

सांगवी पीडब्ल्यूडी मैदान येथे लोकनेते स्व. लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या ६३ व्या जयंतीनिमित्त आयोजित 'अटल महाआरोग्य शिबिरा'च्या उद्‌घाटन प्रसंगी डॉ. शेटे बोलत होते. शिबिराचे आयोजन आमदार शंकर जगताप मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. यावेळी महापौर रवी लांडगे, स्थायी समिती अध्यक्ष अभिषेक बारणे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, शहर सुधारणा समितीचे सभापती संजय काटे, कला, क्रीडा, साहित्य व सांस्कृतिक समितीचे सभापती कैलास कुटे, शिक्षण समितीच्या सभापती रवीना अंगोळकर, आरोग्य विभाग पुणे परिमंडळाचे उपसंचालक भगवान पवार, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागनाथ यमपल्ले, पिंपरी चिंचवड महापालिका वायसीएम हॉस्पिटल वैद्यकीयअधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे, पिंपरी चिंचवड महापालिकेचे मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. लक्ष्मण गोफणे, डॉ. मनोज कुमार शर्मा, एमक्युअर फार्मासिटिकलचे उपाध्यक्ष राजेश नायर तसेच विविध आरोग्य संस्थांचे प्रतिनिधी, 70 हून अधिक हॉस्पिटलचे मान्यवर डॉक्टर, परिचारिका, रुग्णालय कर्मचारी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे मनोगत डॉ. देविदास शेलार यांनी व्यक्त केले.

डॉ. ओमप्रकाश शेटे त्यांनी आरोग्य योजनांच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र देशाला दिशा देत असल्याचे नमूद केले. डॉ. शेटे यांनी मुख्यमंत्री सहायता निधी आणि आयुष्मान भारत योजनेच्या यशावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, "पूर्वी फक्त २५ हजार रुपयांपर्यंत मिळणारी मदत आता २ लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे. शासन आणि धर्मादाय संस्थांच्या माध्यमातून आतापर्यंत सुमारे १८०० कोटी रुपयांची मदत गरजू रुग्णांपर्यंत पोहोचवण्यात आली आहे, जो एक विक्रम आहे." महात्मा फुले जन आरोग्य योजनेची मर्यादा १.५ लाखांवरून ५ लाख रुपये करण्यात आली आहे. राज्यातील संलग्न रुग्णालयांची संख्या १७९२ वरून ४५३७ पर्यंत वाढवण्यात आली आहे, जेणेकरून दुर्गम भागातील रुग्णांनाही उपचार मिळतील.

महिलांच्या आरोग्याबाबत बोलताना डॉ. शेटे यांनी सर्वाइकल कॅन्सर (गर्भाशयाचा कॅन्सर) रोखण्यासाठी लसीकरणाचे महत्त्व सांगितले. "लसीकरणाबाबत समाजात पसरवले जाणारे गैरसमज चुकीचे आहेत. 'अटल महाआरोग्य शिबिरा'च्या माध्यमातून जास्तीत जास्त महिलांपर्यंत या आरोग्य सुविधा पोहोचवणे हे आमचे ध्येय आहे," असे त्यांनी स्पष्ट केले. समाजातील उपेक्षित असलेल्या तृतीयपंथी बांधवांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आयुष्यमान मिशनच्या माध्यमातून योजना आणल्या जातील. रामायणातील त्यांच्या निष्ठेचा दाखला देत त्यांनी सांगितले की, तृतीयपंथी समाजाला 'आयुष्मान भारत' योजनेचा १००% लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासनामार्फत विशेष मिशन राबवले जाईल. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नाना शिवले यांनी केले. आयुष्मान भारत कार्ड आणि सॉफ्टवेअरमधील तांत्रिक बाबी लवकरच सुरळीत होतील. विशेषतः पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील तक्रारी सोडवण्यासाठी स्वतंत्र 'कंट्रोल रूम' (नियंत्रण कक्ष) किंवा कॉन्फरन्स रूम उभारण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### महाराष्ट्र राज्य महिला आयोग पुरस्काराने अभिनेत्री अक्षता कांबळी सन्मानित

■ उपमुख्यमंत्री सुनेत्रा ताई पवार यांच्या हस्ते राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

कणकवली (दैनिक संध्या) : मालवणी सम्राज्ञी म्हणून ज्यांची सर्वत्र ओळख आहे, ज्यांनी पुरुषप्रधान संस्कृती मोडीत काढीत सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पहिला महिला दशावतार सुरू करून गेली पंधरा वर्षे कला क्षेत्रा बरोबर समाजसेवा करत महिलाना व्यासपीठ उपलब्ध करुन दिले.त्यांच्या या कार्याची दखल महाराष्ट्र राज्य महिला आयोग च्या अध्यक्षा रुपाली ताई चाकणकर व कोकण विभाग अध्यक्षा सुनीता गणगे, मुंबई पुणे विभाग प्रमुख लक्ष्मण मानकर यांनी घेतली. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने ७ मार्च २०२६ रोजी पु ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी (रविंद्र नाट्य गृह) प्रभादेवी मुंबई येथे पुरस्कार प्रदान करण्यात आला . संपूर्ण महाराष्ट्र मधून विविध क्षेत्रातील महिला पुरस्कारासाठी आल्या होत्या त्यात सिंधुदुर्ग जिल्ह्यातून अक्षता कांबळी पहिल्या मानकरी ठरल्या.रोख रक्कम ,सन्मान चिन्ह सन्मान पत्र , मानाची शाल, सावित्रीबाईंचे पुस्तक ,आणि भेट वस्तु असा ह्या पुरस्काराचे स्वरूप आहे .अक्षता कांबळी यांना शासनाचा जिल्हास्तरीय अहिल्याबाई होळकर पुरस्कार ही जाहीर झाला आहे .या दोन्ही पुरस्कारांसाठी सर्व स्तरातून त्याचं कौतुक होत आहे. या पुरस्कारांसाठी सिंधुदुर्ग जिल्ह्या महिला व बाल विकास अधिकारी व कर्मचारी यांचे अक्षता कांबळी यांनी मन :पूर्वक आभार मानले.



### संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळाप्रमुखपदी ॲड.राजेंद्र उमाप

आळंदी (दैनिक संध्या) : संत ज्ञानेश्वर महाराजांच्या आषाढी वारी पायी पालखी सोहळ्यासाठी यंदा सोहळाप्रमुखपदी पुण्यातील ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. राजेंद्र बाबूराव उमाप यांची निवड करण्यात आली आहे. माऊली देवस्थानचे प्रमुख विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे यांनी ही माहिती दिली. यावेळी विश्वस्त चैतन्य महाराज कबीर, हभप पुरुषोत्तम महाराज पाटील, ॲड.रोहिणी पवार आणि व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर उपस्थित होते. आषाढी वारीसाठी संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे प्रस्थान ८ जुलै रोजी आळंदी येथून होणार असून २५ जुलै रोजी पंढरपूर येथे आषाढी एकादशीचा मुख्य सोहळा पार पडणार आहे. आळंदीत संस्थान कमिटीच्या बैठकीत सोहळ्याच्या नियोजनाबाबत चर्चा करताना उमाप यांची सोहळाप्रमुख म्हणून निवड करण्यात आल्याचे देखणे यांनी सांगितले. ॲड.उमाप हे पुण्यातील ज्येष्ठ वकील असून त्यांनी बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा या संस्थेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष अशी महत्त्वाची पदे भूषवली आहेत. यापूर्वी त्यांनी संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख विश्वस्त म्हणूनही जबाबदारी पार पाडली आहे. त्यांच्या प्रशासकीय अनुभवाचा लाभ पालखी सोहळ्याच्या व्यवस्थापनात होईल, असा विश्वास संस्थानकडून व्यक्त करण्यात आला. दरम्यान, सोहळाप्रमुखपदी निवड झाल्यानंतर उमाप यांनी वारकरी भाविकांच्या सोयी-सुविधांना प्राधान्य देणार असल्याचे सांगितले. "पालखी प्रस्थानापासून सोहळा पंढरपूरात दाखल होईपर्यंत तसेच पंढरपूरहून परतीच्या प्रवासातही लाखो वारकऱ्यांच्या आरोग्याची आणि सुरक्षिततेची विशेष काळजी घेतली जाईल. प्रशासनाशी समन्वय ठेवून सोहळा वैभवात, आनंदात, शिस्तीत आणि जल्लोषात पार पाडण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या जातील," असे त्यांनी सांगितले.

### रांगोळीच्या माध्यमातून 'स्वच्छतेचा संदेश'; आळंदीत नगरपरिषदेचा अभिनव उपक्रम



आळंदी (दैनिक संध्या) : शहरातील काही ठिकाणी नागरिकांकडून वारंवार उघड्यावर कचरा टाकला जात असल्याने स्वच्छतेच्या दृष्टीने गंभीर प्रश्न निर्माण होत आहेत. या पार्श्वभूमीवर आळंदी नगरपरिषदेने अशा ठिकाणी रांगोळी काढून स्वच्छतेचा संदेश देत त्या जागांचे सुशोभीकरण करण्याचा अभिनव उपक्रम हाती घेतला आहे. या माध्यमातून नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करणे आणि शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी त्यांचा सहभाग वाढविणे हा उद्देश असल्याचे नगरपरिषदेने स्पष्ट केले आहे. आळंदी नगरपरिषदेमार्फत शहरात दैनंदिन घंटागाडीच्या माध्यमातून घरगुती कचरा संकलनाची नियमित व्यवस्था करण्यात आली आहे. तरीदेखील काही नागरिकांकडून आपल्या सोयीनुसार सार्वजनिक ठिकाणी तसेच उघड्यावर कचरा टाकला जात असल्याचे वारंवार निदर्शनास येत आहे. यापूर्वी अशा प्रकारे कचरा टाकणाऱ्यांवर नगरपरिषदेच्या पथकांमार्फत दंडात्मक कारवाईही करण्यात आली होती. मात्र अपेक्षित प्रमाणात सुधारणा दिसून न आल्याने जनजागृतीसाठी हा वेगळा उपक्रम राबविण्यात येत आहे. मरकळ रस्ता डीपी, जनाबाई धर्मशाळा परिसर, मरकळ चौक, चावडी चौक, प्रदक्षिणा रस्ता, प्रदक्षिणा रस्त्यावरील चायनीज सेंटरजवळ, घुंडरे अळी चौक, वडगाव रस्ता सुलभ शौचालय शेजारी, चाकण चौक, वाय जंक्शन, केळगाव रस्ता, सुलभ शौचालयाजवळील फूटपाथ, केळगाव बायपास, सिद्धबेट रस्ता तसेच पुलावरील परिसर अशा विविध ठिकाणी रांगोळी काढून परिसराचे सुशोभीकरण करण्यात आले आहे. दरम्यान, ज्या ठिकाणी वारंवार कचरा टाकला जातो त्या ठिकाणी रांगोळीच्या माध्यमातून स्वच्छतेचा संदेश देण्याचा हा प्रयत्न असल्याचे नगरपरिषदेने सांगितले. "ज्या ठिकाणी वारंवार उघड्यावर कचरा टाकला जातो, त्या ठिकाणी रांगोळी काढून स्वच्छतेचा संदेश देत त्या जागांचे सुशोभीकरण करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. या माध्यमातून नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण होऊन शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी त्यांचा सहभाग वाढेल," असे मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी सांगितले.

# रेकॉर्डवरील गुन्हेगाराची थेट नागपूर कारागृहात रवानगी

## एमपीडीए कायद्यांतर्गत १ वर्षासाठी जेल; बारामती तालुका पोलिसांचा गुन्हेगारांना इशारा

बारामती (दै. संध्या)



बारामती तालुका पोलीस ठाण्याने रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारावर कठोर पाऊल उचलत त्याच्यावर एमपीडीए कायदा १९८१ अंतर्गत कारवाई केली आहे. गंभीर स्वरूपाचे गुन्हे करूनही सुधारणा न दाखवणाऱ्या आरोपीला थेट नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्यात आले आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, तांदुळवाडी (ता. बारामती) येथील सुरेंद्र रवींद्र काजळे याच्याविरुद्ध पुणे ग्रामीण तसेच बारामती परिसरातील विविध पोलीस ठाण्यांत गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. दरोडा, दुखापत, गंभीर दुखापत, विनयभंग व फसवणूक अशा प्रकारच्या गुन्ह्यांमध्ये त्याचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाले आहे. गुन्हेगारी प्रवृत्ती कायम ठेवत पुन्हा नव्याने गुन्हे करण्याचा क्रम सुरूच असल्याने त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, औषधी द्रव्यविषयक गुन्हेगार, हातभट्टीवाले, धोकादायक व्यक्ती यांच्या विघातक कृत्यास आळा घालण्याबाबत अधिनियम १९८१ (MPDA) अंतर्गत प्रस्ताव सादर करण्यात आला. हा प्रस्ताव पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्यामार्फत जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे पाठविण्यात आला. सर्व कागदपत्रांची छाननी करून जिल्हाधिकाऱ्यांनी आरोपीस एक वर्षासाठी स्थानबद्ध करण्याचे आदेश दिले. त्यानुसार पोलिसांनी तात्काळ अंमलबजावणी करत आरोपीला नागपूर मध्यवर्ती कारागृहात हलविले. बारामती तालुका पोलिसांच्या या निर्णायक कारवाईमुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून गुन्हेगारी प्रवृत्तींवर आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक संदीपसिंग गिल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.बारामती पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम पवार पोलीस अंमलदार महेश बनकर स्थानिक गुन्हे शाखा आणि सागर देशमाने विकास खाडे बारामती तालुका पोलीस ठाणे यांनी ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.

> 'बारामती विभागात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांची भूमिका ठाम आणि कठोर आहे. रेकॉर्डवरील तसेच सराईत गुन्हेगारांवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत असून, समाजात दहशत निर्माण करणाऱ्यांना कुठलीही सूट दिली जाणार नाही. वारंवार गुन्हे करणाऱ्यांवर एमपीडीएसारख्या कठोर कायद्यांखाली थेट कारवाई होईल'.
>
> **- गणेश बिरादार, अप्पर पोलीस अधीक्षक**

> 'बारामती उपविभागात शांतता आणि सुरक्षितता टिकवण्यासाठी पोलिस प्रशासन कटिबद्ध आहे. वारंवार गुन्हे करणाऱ्या व्यक्तींवर विशेष नजर ठेवून कायदेशीर कारवाईचा बडगा उगारला जाईल.सामान्य नागरिकांच्या सुरक्षेशी तडजोड होणार नाही..'
>
> **- सुदर्शन राठोड, उपविभागीय पोलीस अधिकारी**

> 'जिल्ह्यात गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक कारवाईवर विशेष भर देण्यात येत आहे. २०२५ आणि २०२६ या कालावधीत आतापर्यंत १६ गुंडांना एमपीडीए अंतर्गत स्थानबद्ध करण्यात आले असून ही कारवाई पुढेही सातत्याने सुरू राहणार आहे. कायद्याचा धाक निर्माण करणे आणि नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना बळकट करणे हे आमचे प्रमुख उद्दिष्ट आहे. गुन्हेगारीकडे वळणाऱ्यांना वेळीच इशारा देणे आणि आवश्यकतेनुसार कठोर पावले उचलणे याबाबत पोलिस प्रशासन कटिबद्ध आहे.'
>
> **- संदिपसिंह गिल, पोलीस अधीक्षक**

## वाल्हेत उदयगिरी फाउंडेशनतर्फे कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

वाल्हे (दै. संध्या)

सामाजिक चळवळीचे केंद्रबिंदू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुरंदर तालुक्यातील वाल्हे गावात उदयगिरी सोशल फाउंडेशन व नाना दाते मित्र परिवारातर्फे जागतिक महिला दिनानिमित्त कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला . यावेळी वाल्हे ग्रामपंचायत नजीक शाहू फुले आंबेडकर अभ्यासिकेच्या सभागृहासमोर वृक्षारोपण करूनच या सन्मान सोहळ्याला सुरवात करण्यात आली.या कार्यक्रमात जेजुरी पोलीस ठाण्याच्या पोलीस उपनिरीक्षक दिपाली पवार यांसह लेखिका राधिका घोरपडे जिल्हा परिषदेच्या नवनिर्वाचित सदस्या डॉ. प्राजक्ता दुर्गाडे विधितज्ञ प्रिया दरेकर माय मराठी संघाच्या कल्पना शेरे माजी उपसरपंच सम्राज्ञी लंबाते तसेच दिपाली नलावडे धनश्री कसेकर गीता नांगरे आदी महिलांना विविध मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र तसेच पुस्तक देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी वाल्हे गावचे सरपंच अतुल गायकवाड उपसरपंच सागर भुजबळ सामाजिक कार्यकर्ते नाना दाते उदयगिरी फाउंडेशनचे शिवशंकर मोरे सचिन म्हसे तसेच सतीश पवार असलम नदाफ दिगंबर दाते आदी मान्यवर उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सचिन दुर्गाडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार स्वप्नील बरकडे यांनी मानले.

## राष्ट्रवादी विद्यार्थी कॉँग्रेस बारामती शहर कार्यकारणी जाहीर

**राष्ट्रवादी विद्यार्थी कॉँग्रेस अध्यक्षपदी मेघराज माने**

बारामती (दै. संध्या)




महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार, राज्यसभा खासदार पार्थ पवार, युवा नेते जय पवार यांच्या सूचनेनुसार बारामती शहर राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष ॲड किरण इंगळे, विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष मेघराज माने यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रवादी शहर पक्ष कार्यालयात (दि:५) रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत राष्ट्रवादी विद्यार्थी कॉँग्रेस बारामती शहर (अजित पवार गट) कार्यकारणी जाहीर करण्यात आला. यामध्ये राष्ट्रवादी विद्यार्थी कॉँग्रेस बारामती शहर अध्यक्ष पदी मेघराज मनीषा संतोष माने यांची फेर निवड करण्यात आली. तर कार्याध्यक्षपदी- प्रांजली भोसले, इरफान तांबोळी, तेजस यादव, उपाध्यक्ष पदी - ओम लोंढे,आकाश साबळे,गणेश मोरे,असीम तांबोळी,ऋषी निघोल,ओम पवार,हेमल शहा, रोहन चव्हाण, सरचिटणीस पदी - अमर साबळे,पृथ्वीराज देवकाते, गणेश भिसे, झिशान बागवान, ओम अहिवळे, नामदेव सुळ, सौरव देवकाते, सोशल मीडिया पदी -पवन राऊत, प्रसिद्धी प्रमुख -संगम माने यांची निवड करण्यात आली. राष्ट्रवादी विद्यार्थी कॉँग्रेस बारामती शहर कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून, यामध्ये स्थानिक पातळीवर संघटनात्मक बांधणीवर भर देणार असल्याचे राष्ट्रवादी विद्यार्थी कॉँग्रेस चे शहराध्यक्ष मेघराज माने यांनी सांगितले. याप्रसंगी बारामती शहर राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष ॲड किरण इंगळे, माजी नगराध्यक्ष इम्तियाजभाई शिकीलकर, युवक अध्यक्ष अभिजीत घाडगे, शहर पक्ष कार्यालयाचे जनसंपर्क अधिकारी (PRO) सुरज देवकाते तसेच पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ज्ञानशक्ती विकास वाहिनी संस्थेला राज्यस्तरीय 'महिला गौरव' पुरस्कार



मंचर (दै. संध्या)

आंबेगाव तालुक्यातील महिला व युवतींच्या सर्वांगीण विकासासाठी गेली दोन दशकांहून अधिक काळ कार्यरत असलेल्या ज्ञानशक्ती विकास वाहिनी संस्थेच्या कार्याची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली आहे. संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी गार्गी काळे-वळसे पाटील यांना राज्य महिला आयोगातर्फे 'महिला गौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

जागतिक महिला दिनानिमित्त दादर येथील रवींद्र नाट्य मंदिर येथे आयोजित कार्यक्रमात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्कारामध्ये मानचिन्ह व प्रमाणपत्राचा समावेश आहे.

कार्यक्रमास राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर, आमदार मनीषा कायंदे, मुंबईच्या रितू तावडे, आयोगाच्या सदस्य सचिव नंदिनी आवडे, लक्ष्मण मानकर, पुणे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी रोहिणी ढवळे, रोहिणी पडवळ, प्रियंका गजमल, यश आलं खानविलकर यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

ज्ञानशक्ती विकास वाहिनी संस्था गेली वीस वर्षे महिला व युवतींच्या सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबवत आहे. संस्थेच्या पुढाकारातून मुलींच्या समुपदेशनासाठी पुणे शहर पोलीस आयुक्तालय तसेच नारायणगाव आणि यवत पोलीस ठाण्यात 'बालस्नेही पोलीस कक्ष' सुरू करण्यात आले आहेत. याशिवाय महिलांना बेडसाईड केअर, ब्युटी पार्लर, टेलरिंग, अन्नप्रक्रिया आदी क्षेत्रांत मोफत प्रशिक्षण देऊन रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

संस्थेच्या माध्यमातून आंबेगाव तालुक्यातील ९८ शाळांमधील चार हजारांहून अधिक विद्यार्थिनींना 'गुड टच–बॅड टच' विषयावर जनजागृती करण्यात आली आहे. तसेच ४५० विद्यार्थिनींना स्वसंरक्षणासाठी कराटे प्रशिक्षण देण्यात आले आहे. पुढील काळात महिलांसाठी इलेक्ट्रिक टू-व्हीलर टेक्निशियन प्रशिक्षण सुरू करण्याचा संस्थेचा मानस असल्याची माहिती गार्गी काळे-वळसे पाटील यांनी दिली. या पुरस्कारामुळे संस्थेचे कार्य अधिक जोमाने पुढे नेण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

> **१७ वर्षांनंतर पुन्हा राज्यस्तरीय सन्मान :** महात्मा गांधी तंटामुक्त अभियानाची प्रभावी अंमलबजावणी आणि जनजागृतीबद्दल २००९ मध्ये ज्ञानशक्ती विकास वाहिनी संस्थेला तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला होता. तब्बल १७ वर्षांनंतर त्यांच्या पत्नी आणि सध्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते संस्थेला पुन्हा राज्यस्तरीय सन्मान मिळणे हा संस्थेसाठी विशेष योगायोग ठरला आहे.

## नायगाव येथे किसन (नाना) चौधरी यांच्या पुण्यस्मरणानिमित्त कीर्तन सोहळा

कोरेगावमुळ (दै. संध्या)

पूर्व हवेली तालुक्यातील नायगाव येथे कै. ह.भ.प. किसन (नाना) राजाराम चौधरी यांच्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्त सुश्राव्य कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. वारकरी भूषण ह.भ.प. अर्जुन महाराज पळशीकर यांच्या प्रभावी कीर्तनाने उपस्थितांना आध्यात्मिक अनुभूती दिली.

कीर्तनाची सुरुवात 'राम कृष्ण हरी' या जयघोषाने झाली. आपल्या कीर्तनातून अर्जुन महाराज पळशीकर यांनी समाजप्रबोधन करत अभंगांचा सखोल अर्थ श्रोत्यांना समजावून सांगितला.

या कार्यक्रमास मृदंगाचार्य ह.भ.प. विठ्ठल महाराज गव्हाणे, गायनाचार्य ह.भ.प. रसाळ महाराज, ह.भ.प. भास्कर महाराज तुरे, अखिल भारतीय वारकरी मंडळ पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष ह.भ.प. आनंद महाराज तांबे, ह.भ.प. तुषार महाराज चौधरी, माजी आमदार जगन्नाथ शेवाळे, माजी आमदार अशोक पवार, चिंतामणी यशवंत सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सुभाष जगताप, पुणे जिल्हा नियोजन समिती सदस्य दिलीप वाल्हेकर, माजी सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती रोहिदास उंद्रे, जिल्हा परिषद माजी सदस्य महादेव कांचन, पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती शशिकांत गायकवाड, संचालक विजय चौधरी, डॉ. मणिभाई देसाई पतसंस्थेचे उपाध्यक्ष रामदास चौधरी, माजी संचालक रघुनाथ चौधरी, कुबेर पतसंस्थेचे संस्थापक रमेश हरगुडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रशांत काळभोर, पंचायत समिती सदस्य युवराज काकडे, नंदू पाटील काळभोर, संदीप गोते, राजेंद्र रतन चौधरी, विजय पायगुडे, रंगनाथ कड, बाळासाहेब चोरघे, सदाशिव कोलते, रामचंद्र पवार, गणेश चौधरी, नितीन हगवणे, बापू चौधरी, तसेच उत्तम निवेदक समाधान अवचट आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी पंचक्रोशीतील स्नेही, नातेवाईक आणि मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा परिषद पुणे आयोजित महिला सक्षमीकरणाचा प्रेरणादायी उत्सव

नाझरे सुपे (दै. संध्या)



दिनांक ७ मार्च २०२६ रोजी पुणे जिल्हा परिषद आयोजित "मिनी सरस – सावित्री जत्रा २०२६" विक्री व प्रदर्शनाचा भव्य शुभारंभ सुनेत्रा अजित पवार यांच्या शुभहस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. ग्रामीण महिलांच्या कष्ट, जिद्द आणि स्वावलंबनाचा सन्मान करणारा हा कार्यक्रम महिला सक्षमीकरणाच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला.

या प्रसंगी स्वयंसहाय्यता समूहांच्या आर्थिक बळकटीसाठी विविध बँकांच्या माध्यमातून तब्बल ४० कोटी रुपयांच्या कर्ज धनादेशांचे वितरण करण्यात आले. ग्रामीण महिलांनी उभारलेल्या उद्योगांना आर्थिक पाठबळ देत त्यांच्या आत्मनिर्भरतेच्या प्रवासाला नवी गती मिळाली.

कार्यक्रमात विभागीय यशवंतराव चव्हाण पंचायत राज पुरस्कार वितरणासह पंतप्रधान आवास योजना – ग्रामीण आणि महाआवास योजना अंतर्गत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायती, संस्था व घटकांचा गौरव करण्यात आला. ग्रामीण विकासाच्या दिशेने सातत्याने कार्य करणाऱ्या घटकांना हा सन्मान प्रेरणादायी ठरला.

यावेळी मेधा कुलकर्णी, शंकर मांडेकर, तसेच बापूसाहेब पठारे यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमास मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शालिनी कडू, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी तसेच महिला स्वयंसहाय्यता समूह मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमात प्रभाग संघांमार्फत कृषी ट्रॅक्टर खरेदी उपक्रमाला चालना देण्यात आली, तसेच पुणे जिल्हा परिषद यांच्या नाविन्यपूर्ण योजनेअंतर्गत ई-मोबाईल व्हॅन वाहनांच्या प्रतीकात्मक चाव्यांचे वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे ग्रामीण महिलांनी तयार केलेली उत्पादने थेट शहरातील बाजारपेठेत पोहोचण्याचा नवा मार्ग खुला होत आहे.

"मिनी सरस – सावित्री जत्रा २०२६" अंतर्गत आयोजित विक्री व प्रदर्शन सिंचन नगर, एग्रीकल्चर कॉलेज परिसर, शिवाजीनगर, पुणे येथे ७ मार्च ते ११ मार्च २०२६ या कालावधीत पुणेकरांसाठी खुले आहे.

ग्रामीण महिलांच्या कष्टातून साकारलेली हस्तकला, घरगुती उद्योग, स्थानिक उत्पादने व पारंपरिक खाद्यपदार्थ अनुभवण्याची सुंदर संधी या प्रदर्शनातून उपलब्ध झाली आहे.

पुणेकरांनी मोठ्या संख्येने या प्रदर्शनाला भेट देत ग्रामीण महिलांच्या उद्योगांना प्रोत्साहन द्यावे आणि महिला सक्षमीकरणाच्या या प्रेरणादायी चळवळीला अधिक बळ मिळत आहे ग्रामीण महिलांच्या स्वप्नांना बाजारपेठ मिळाली, तर आत्मनिर्भर भारताच्या वाटचालीला नवी ऊर्जा मिळते.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## स्नेहांकुर द रे ऑफ होप संस्थेच्यावतीने शाळांना पुस्तक पेटीचे वाटप

■ काही शाळांना ई लर्निंग टिव्ही संच भेट

जेजुरी (दैनिक संध्या) : पुणे येथील स्नेहांकुर द रे ऑफ होप या सामाजिक संस्थेच्या वतीने वाल्हे परिसरातील सर्व शाळांना लेखन साहित्य व वाचनालयासाठी पुस्तकपेटी यांचे वाटप करण्यात आले. स्नेहांकुर द रे ऑफ होप या सामाजिक संस्थेच्या वतीने दरवर्षी ग्रामीण आणि दुर्गम भागातील मराठी शाळेतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण शैक्षणिक विकासासाठी विविध उपक्रम राबविले जातात.मराठी शाळांचा दर्जा ,गुणवत्ता वाढावी या साठी ही संस्था काम करीत असल्याचे सचिन सातभाई यांनी सांगितले वाल्हे केंद्रातील सर्व शाळेतील प्रत्येक विदयार्थ्याला थ्री इन वन च्या वह्या व पेन्सिल बॉक्स, तसेच सर्व शाळांना वाचनालय यासाठी पुस्तक पेटी, तसेच दुर्गम भागात असणाऱ्या तरसदरा, पिंगोरी, कामठवाडी, पिसुर्टी, जेजुरी या शाळांना ई -लर्निंग टीव्ही संच देण्यात आला. स्नेहांकुर संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष ऍड.वृषाली दातार , घनश्याम दातार , अभिजीत दातार, प्रीती जाधव, विवेक साने, पूर्वा गदो, राम फडके, सागर नातू, विनय पत्की गौरी पत्की सुजाता कुलकर्णी यांच्या माध्यमातून हा शैक्षणिक उपक्रम राबविण्यात आला. यांप्रसंगी जि. प. सदस्या डॉ. प्राजक्ता दिगंबर दुर्गाडे, दौंडज गावाच्या सरपंच अलका माने, उपसरपंच विजय फाळके, तंटामुक्ती समितीचे लक्ष्मण दगडे,केंद्रप्रमुख जितेंद्र कुंजीर, व वाल्हे परिसरातील शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तरसदरा शाळेचे शिक्षक सचिन सातभाई यांनी केले. व आभार दौंडज शाळेचे मुख्याध्यापक बाळकृष्ण घाटे यांनी मानले.



## आबासाहेब अत्रे प्रशालेत महिला दिन साजरा

पुणे (दैनिक संध्या) : सोमवार पेठेतील आबासाहेब अत्रे प्रशालेच्या ग्रंथालयात आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या भारतीय महिलांच्या छायाचित्र व पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. साहित्य, विज्ञान, संशोधन, क्रीडा, शिक्षण, प्रशासन आणि कला अशा विविध क्षेत्रांत कर्तृत्वाची मोहोर उमटवलेल्या महिलांचा गौरव या प्रदर्शनातून करण्यात आला. हे प्रदर्शन संदर्भतज्ज्ञ व ग्रंथप्रसारक प्रसाद भडसावळे यांनी आयोजित केले होते. या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांना भारतीय महिलांच्या कार्याचा परिचय करून देण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी महिला दिनानिमित्त आईपासून ते शिक्षिका, ताई-माई, आक्का-काकी, दादी तसेच समाजातील विविध क्षेत्रांत कार्य करणाऱ्या महिलांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. तसेच वर्षातील ३६५ दिवस समाजातील सर्व महिलांप्रती सद्भावना ठेवत त्यांच्या आत्मसन्मानाचा आदर राखण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. या कार्यक्रमास अत्रे प्रशालेचे प्राचार्य प्रवीण सुपे, प्रसाद भडसावळे, केशव तळेकर, उत्तम साळवे आदी उपस्थित होते.

## सोज्वळ, शालीनता व अनुशासनता हिराबाई बडोदेकर यांची गुणवैशिष्ट्ये

पुणे (दैनिक संध्या) : गानहिरा हिराबाई बडोदेकर यांच्या गायनात आणि स्वभावात ऋजुता होती. हिराबाईंचे गाणे सहज, भावपूर्ण होते. सोज्वळ, शालीनता व अनुशासन हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील गुण सादरीकरणातही दिसून येत असत. शांत व संयत भाव हे त्यांच्या अभिव्यक्तीचे वैशिष्ट्य होते. शास्त्रीय संगीतात महिला कलाकारांना स्वरमंच मिळवून देण्यासाठी त्यांचे कार्य महत्त्वपूर्ण ठरले, अशी हिराबाई बडोदेकर यांची गायन आणि स्वभातील वैशिष्ट्ये रसिकांसमोर उलगडली. निमित्त होते डॉ. प्रभा अत्रे फाऊंडेशन संचालित स्वरमयी गुरुकुल आयोजित 'किराना परंपरा' या मालिकेचे. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सहाव्या सत्रात रविवारी (दि. ८) किराना घराण्याच्या पहिल्या ख्यातनाम गायिका, गानहिरा हिराबाई बडोदेकर यांच्या सांगीतिक योगदानावर विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. जंगली महाराज रस्त्यावरील स्वरमयी गुरुकुल सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. संगीताचे अभ्यासक डॉ. चैतन्य कुंटे आणि डॉ. अतींद्र सरवडीकर यांनी हिराबाई बडोदेकर यांच्या खयाल गायकीची मर्मस्थळे संवादात्मक कार्यक्रमातून उलगडली. सुरुवातीला फाऊंडेनचे कार्यक्रम निर्देशक प्रसाद भडसावळे यांनी उपक्रमाविषयी अवगत केले. सचिव डॉ. भारती एम. डी. यांनी कलाकारांचे स्वागत केले.



## महाराष्ट्रात प्रचंड यशानंतर 'लग्नपंचमी' नाटकाचा परदेश दौरा जाहीर

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्रात प्रेक्षकांचा भरघोस प्रतिसाद मिळालेल्या 'लग्नपंचमी' या धमाल विनोदी मराठी नाटकाचा आता परदेश दौरा (वर्ल्ड टूर) जाहीर करण्यात आला आहे. मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधत नाटकाच्या २५व्या प्रयोगानिमित्त निर्मात्यांनी ही घोषणा केली. हा मराठी नाटकांच्या इतिहासातील अशा प्रकारचा पहिलाच व्यापक परदेश दौरा ठरणार आहे. लेखिका मधुगंधा कुलकर्णी आणि दिग्दर्शक निपुण धर्माधिकारी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या नाटकात स्वप्नील जोशी आणि अमृता खानविलकर यांच्या प्रमुख भूमिका आहेत. जानेवारीपासून सुरू झालेल्या या नाटकाचे अवघ्या दोन महिन्यांत २५ प्रयोग पूर्ण झाले असून महाराष्ट्रभर या नाटकाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. रवींद्र नाट्य मंदिर येथे झालेल्या २५व्या प्रयोगावेळी फ्लिक्स प्ले एंटरटेन्मेंटचे निर्माता यतीन पाटील यांनी परदेश दौऱ्याची घोषणा केली. या दौऱ्यात अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, आशियातील देश, मध्यपूर्व तसेच युरोप आणि युनायटेड किंग्डम येथे नाटकाचे प्रयोग आयोजित करण्यात येणार आहेत. यतीन पाटील म्हणाले, "मराठी नाटकांच्या बाबतीत जगभरातील प्रयोगांची एकत्र घोषणा क्वचितच होते. 'लग्नपंचमी'च्या बाबतीत आम्ही हा प्रयोग करणार आहोत. महाराष्ट्रात मिळालेल

# प्रभात मित्र मंडळात ८ मार्च जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

मुंबई (दै. संध्या)




विक्रोळी कन्नमवार नगरातील ज्येष्ठ नागरिक प्रभात मित्र मंडळात ८ मार्च जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला.या प्रसंगी विभागातील शैक्षणिक,सामाजिक, राजकीय,क्रीडाविषयक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान महिलांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे अध्यक्ष विवेक गायकवाड होते.प्रमुख पाहुण्या म्हणून दैनिक द ग्लोबल टाईम्स च्या कार्यकारी संपादक शीतल हरीष करदेकर तर विशेष अतिथी म्हणून नगरसेविका सुनिता चंद्रशेखर जाधव होत्या.नगरसेविका जाधव यांची मुंबई महानगर पालिकेच्या महिला व बालकल्याण समितीच्या सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल त्यांना सन्मानचिन्ह शाल,व गुलाबपुष्प देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.शीतल हरीष करदेकर यांना सन्मानचिन्ह,शाल व गुलाबपुष्प देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाचे सचिव ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे यांनी केले. महिला दिन हा रोजचाच, महिलांचे हक्क अधिकार मिळवून देण्यासाठी दिलेला वैश्विक लढा महत्त्वाचा, पण स्त्रीमुक्तीपेक्षा ,दोघांच्या साथीने संसार होतो. गुणवंत स्त्रीचा सत्कार करताना तिच्या पाठीशी सोबत असणाऱ्या जोडीदारासाठी सत्कार होणे आवश्यक!असे प्रतिपादन कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या द ग्लोबल टाइम्स च्या कार्यकारी संपादक शीतल हरीष करदेकर यांनी केले. "समाजात विकृती वाढतेय, तांत्रिक प्रगती होतेय, हातातल्या फोनवर आपला मुलगामुलगी काय करते याकडे आई - वडिलांचं लक्ष असायलाच हवं. धर्मात न अडकता आपल्या मुलांना समाजात योग्य वावरण्याची कला शिकवणे ही मोठी जबाबदारी आहे. स्त्रीबिजाच्या माफियागिरीपर्यंत निर्लज्ज विकृत लोक पोहोचलेत आणि म्हणूनच मुलींना जगण्याची कला नी सावधानता कळणे ही आजची गरज आहे. म्हणून पालकांची जबाबदारी मोठी आहे. " याविषयी सविस्तर बोलून "मराठी भाषा ,मराठीपण टिकवायचं तर मराठीतून व्यक्त होणं, साहित्य, ग्रंथालये मजबूत करणं ही आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे." असेही करदेकर यांनी सांगितले.

याप्रसंगी डॉ अनघा विनय राऊत,डॉ.मनीषा प्रनिल नायर, डॉ.रश्मी जीवन जाधव,डॉ. मंगला सुनिल जाधव,ॲडव्होकेट ज्योती दुराफे,केतकी अरविंद सांगळे,अहिल्या सोपान थोरवे,प्रज्ञा गितेश कदम,खेळाडू साक्षी गितेश कदम,आसावरी प्रमोद भोईटे,अनुराधा अनिल कल्याणकर,गायिका स्वप्ना मुरलीधर रोकडे,स्नेहल दिलिप कांबळे,वृंदा वाघमारे,ॲडव्होकेट गाथा ढाले,श्रध्दा सुभाष रुके,सुनिता अंकुश वीर,पत्रकार सहिष्णुता शरद कांबळे,पत्रकार नयन नासिकेत पानसरे आदिंना सन्मानचिन्ह व गुलाबपुष्प देऊन गौरविण्यात आले.मंडळाचे अध्यक्ष विवेक गायकवाड व ॲडव्होकेट ज्योती दुराफे यांची भाषण झाले.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मंडळाचे माजी अध्यक्ष व विद्यमान कार्यकारिणी सदस्य सुरेश सरनोबत यांनी केले होते.आभार मंडळाचे उपाध्यक्ष निवृत्ती मस्के यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी,खजिनदार गौतम नि.डांगळे,उपसचिव श्रध्दानंद निकम,सदस्य भूमय्या सोमा,बबन माने,पोपट साठे,विलास देशनेहरे,संजय मयेकर आदिंनी मेहनत घेतली होती.

## आर्की क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धा आजपासून (दि.९)

पुणे (दै. संध्या)

■ श्री शिवाजी मराठा सोसायटीच्या कॉलेज ऑफ आर्किटेक्चरकडून स्पर्धेचे आयोजन

श्री शिवाजी मराठा सोसायटीच्या कॉलेज ऑफ आर्किटेक्चर (एसएसएमएससीओए) यांच्या वतीने विद्याश्री डेव्हलपर्स आर्ची क्रिकेट अजिंक्यपद २.० स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा ९ व १० मार्च रोजी सहकारनगर येथील शिंदे हायस्कूलच्या मैदानावर होणार आहे, अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बजरंग सुतार यांनी दिली. स्पर्धेचे हे दुसरे वर्ष असून ही स्पर्धा साखळी व बाद पद्धतीने खेळविण्यात येणार आहे. स्पर्धा मुला व मुलींच्या गटात होणार आहे. मुलांच्या लढती प्रत्येकी पाच षटकांच्या, तर मुलींच्या लढती प्रत्येकी चार षटकांच्या असणार आहेत. स्पर्धेचे उद्घाटन रविवारी होणार आहे. या वेळी विद्याश्री डेव्हलपर्सचे अतीत अदमूलवार, एसएसएमएसचे सचिव अण्णासाहेब थोरात, प्रिन्सिपल बजरंग सुतार आणि चेअरमन नितीन पवार उपस्थित राहणार आहेत. विजेत्या संघांना करंडक व पदक देऊन गौरविण्यात येणार आहे.

स्पर्धेत सहभागी संघ पुढीलप्रमाणे : श्री शिवाजी मराठा सोसायटीचे कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, अनंतराव पवार कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, एमआयटी स्कूल ऑफ आर्किटेक्चर अँड प्लॅनिंग, डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ आर्किटेक्चर (यलो), काशीबाई नवले कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, सिम्बायोसिस स्कूल ऑफ आर्किटेक्चर, मराठवाडा मित्र मंडळ कॉलेज ऑफ आर्किटेक्चर आणि पीडीईए कॉलेज ऑफ आर्किटेक्चर.

## जेजुरीतील जिजामाता विद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

जेजुरी (दै. संध्या)




श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित जेजुरी येथील जिजामाता प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात महिलांच्या सक्षमीकरणाचा संदेश देत विद्यार्थ्यांना व शिक्षकांना प्रेरणादायी मार्गदर्शन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव तसेच विद्यालयाचे राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर आणि प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका गायत्री बेलसरे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या प्रारंभी नयना मेमाणे ,ज्योती धुमाळ, सीमा कोलते,चंद्रभागा बंडेवाड, वैशाली धुमाळ, दिपाली थोरात, मयुरी बारभाई यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी बोलताना प्राचार्य नंदकुमार सागर यांनी सांगितले की, समाजाच्या प्रगतीमध्ये महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. आजच्या आधुनिक युगात महिला शिक्षण, विज्ञान, राजकारण, क्रीडा, सामाजिक कार्य अशा विविध क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रगती करत आहेत. महिलांनी आत्मविश्वासाने पुढे येऊन समाजाच्या विकासात सक्रिय सहभाग घ्यावा, असे त्यांनी मार्गदर्शन करताना सांगितले.

तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना महिलांचा सन्मान राखण्याचे महत्त्वही पटवून दिले. महिलांना समान संधी मिळाल्यास त्या समाजाच्या प्रगतीसाठी मोठे योगदान देऊ शकतात, असेही त्यांनी स्पष्ट केले. प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका गायत्री बेलसरे यांनीही महिला दिनाचे महत्त्व समजावून सांगितले. महिलांच्या शिक्षणामुळे संपूर्ण कुटुंब व समाज प्रगत होतो. मुलींनी शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडवावे आणि भविष्यात विविध क्षेत्रांमध्ये यश संपादन करावे, असे त्या म्हणाल्या.

आत्मविश्वास, स्वावलंबन आणि सामाजिक जबाबदारी यांचे महत्त्व पटवून दिले. महिलांनी आपल्या हक्कांसाठी जागरूक राहून समाजात सकारात्मक बदल घडवून आणावा, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमात महिला सक्षमीकरणावर आधारित घोषवाक्ये व पोस्टर सादर करून महिलांच्या हक्कांबाबत जागरूकता निर्माण केली. माता पालक सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन ज्योती गावडे, मोनिका निगडे,पौर्णिमा धुमाळ,रसिका भुजबळ, सुनंदा भोंगळे, शकुंतला गोडसे, शिल्पा पाटोळे,छाया साबळे, अमृता कांबळे, सुनीता शिंदे, दिपा तुपासणे, सुनील भगत यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या सहभागातून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आयोजित या कार्यक्रमातून महिलांच्या सन्मानाचे व सक्षमीकरणाचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. समाजात महिलांचा आदर राखणे आणि त्यांना प्रगतीची समान संधी देणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, असा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांचे आभार मानण्यात आले आणि महिला सन्मानाचा संदेश देत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## ताणतणाव व्यवस्थापन विषयावर तीन दिवसीय कार्यशाळा



कोरेगावमुळ (दै. संध्या)

सुभाष बाबुराव कुल महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागातर्फे युवक-युवती उन्नयनीकरण उपक्रमांतर्गत 'ताणतणाव व्यवस्थापन व व्यसनमुक्ती' या विषयावर तीन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. गुरुवार ते शनिवार दरम्यान ही कार्यशाळा उत्साहात पार पडली.

कार्यशाळेचे उद्घाटन एकनाथ सिताराम दिवेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल शितोळे यांच्या हस्ते झाले. यावेळी मार्गदर्शन करताना त्यांनी विद्यार्थ्यांनी मानसिक आरोग्याकडे विशेष लक्ष देत ताणतणावाचे योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक असल्याचे सांगितले. उद्घाटनप्रसंगी नेताजी शिक्षण संस्थेचे सचिव धनाजी शेळके आणि प्राचार्य डॉ. नंदकुमार जाधव उपस्थित होते.

कार्यशाळेत विविध तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

डॉ. किशोरी ताकवले यांनी ताणतणाव व्यवस्थापनावर प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले.

डॉ. यशवंत खताळ यांनी व्यसनमुक्ती विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत स.प. महाविद्यालय, डी.वाय. पाटील महाविद्यालय, दौंड महाविद्यालय, सावित्रीबाई फुले महाविद्यालय पिंपळगाव पिसा, राहू महाविद्यालय, खुटबाव महाविद्यालय आदी विविध महाविद्यालयांतील विद्यार्थी सहभागी झाले. विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा अनुभव समाधानकारक असल्याचे सांगितले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी डॉ. नानासाहेब जावळे, डॉ. भाऊसाहेब गव्हाणे, डॉ. अनुराधा गुजर, डॉ. अशोक दिवेकर, डॉ. महादेव थोपटे, डॉ. भाऊसाहेब दरेकर, डॉ. ज्ञानदेव राऊत, डॉ. मनीषा जाधव, डॉ. शोभा वाईकर, डॉ. शाम वासनीकर, प्रा. अरविंद मिंधे, प्रा. शुभम ताकवणे, प्रा. किशोर आढाव यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुरेखा देशमुख आणि प्रा. गौरी निंबाळकर यांनी केले. यावेळी सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते.

- डॉ. राजेंद्र गायकवाड यांनी 'विनोदातून तणावमुक्ती' या विषयावर विद्यार्थ्यांना प्रेरणादायी व्याख्यान दिले.
- प्रा. ओंकार अवचट यांनी तणावमुक्तीसाठी योग्य आहार-विहाराचे महत्त्व सांगितले.
- डॉ. तन्वीर शेख यांनी मोबाईलच्या व्यसनाचे दुष्परिणाम स्पष्ट केले.
- मारुती करंडे यांनी 'हसत खेळत माणूस बनवू या' या विषयावर मार्गदर्शन केले.
- मोहिनी सुरवसे यांनी व्यसनांमुळे वाढणाऱ्या ताणतणावांबाबत विद्यार्थ्यांना जागरूक केले.
- अभिजीत मांडके यांनी योग व प्राणायामाद्वारे तणावमुक्तीचे महत्त्व सांगितले.
- डॉ. विशाल गायकवाड यांनी खेळ व योगाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण केला.

# जेजुरीगडावर गुरव समाजाचा एल्गार

### मुंबईच्या आझाद मैदानावर आंदोलनाची हाक

जेजुरी (दै. संध्या)



मंदिर संस्कृतीचे उपासक असलेल्या भारतीय गुरव समाज बांधवांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी मोठा एल्गार पुकारला आहे. या मागण्यांसाठी मंगळवारी मुंबईतील आझाद मैदान येथे आंदोलन करण्यात येणार आहे. अशी घोषणा महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी गडावर अखिल गुरव समाजाच्या वतीने करण्यात आली. गुरव समाजाच्या विविध मागण्या प्रलंबित असून या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या जेजुरी गडावर गुरव समाज बांधव मोठ्या संख्येने एकत्र आले. खंडोबा देवाचे दर्शन घेऊन महाअभिषेक करण्यात आला आणि खंडोबा मंदिरातील ऐतिहासिक तलवार (खंडा) हाती घेत आंदोलनाचा एल्गार पुकारण्यात आला. भारतीय गुरव समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. विजयअण्णा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी पिंपरी-चिंचवडचे नगरसेवक शीतल शिंदे, जेजुरीचे नगराध्यक्ष जयदीप बारभाई आणि संभाजीनगरच्या नगरसेविका अर्चना नीलकंठ यांच्या उपस्थितीत आंदोलनाची घोषणा करण्यात आली.

या प्रसंगी सामाजिक कार्यकर्त्या मनीषा पांडे, डॉ. मीनाक्षी पुजारी, सदानंद बारभाई, भाग्यश्री भालेराव, डॉ. रंगनाथ गुरव, ज्योती क्षीरसागर, माधव बारभाई, ऋषिकेश सातभाई, भाग्यश्री बारभाई आदी मान्यवरांसह राज्य आणि राज्याबाहेरील विविध गुरव संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुंबईतील आंदोलनात गुरव समाजाच्या प्रलंबित मागण्या शासनापुढे मांडल्या जाणार आहेत. त्यामध्ये राज्यातील मंदिरांमध्ये विश्वस्त मंडळात गुरव समाजाला ५० टक्के प्रतिनिधित्व देणे, देवस्थान जमिनींच्या प्रकरणात वर्ग-३ वतन खालसा करणे, जमिनींचा फेरसर्वे करणे, बेकायदेशीर हस्तांतरण रद्द करणे, मूळ सनदधारकांना ताबा देणे, बेकायदेशीर कुळे हटवणे, सार्वजनिक कामांसाठी घेतलेल्या जमिनीचा योग्य मोबदला देणे तसेच वारसा नोंद प्रक्रिया सुरू करणे अशा विविध मागण्यांचा समावेश आहे.

शेकडो वर्षांची मंदिर सेवा परंपरा जपणाऱ्या गुरव समाजाला शासनाने न्याय न दिल्यास शेकडो तुताऱ्या घेऊन पुन्हा एकदा आझाद मैदानावर एल्गार पुकारला जाईल, असा इशारा डॉ. रंगनाथ गुरव यांनी पत्रकारांशी बोलताना दिला.

## संशोधन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी सातत्याने काम - डॉ. हरीश तिवारी

पिंपरी (दै. संध्या)

संशोधन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी आणि गुणवत्तापूर्ण संशोधन प्रबंधांना प्रोत्साहन देण्यासाठी पीसीसीओईआर चा संशोधन व विकास विभाग सातत्याने काम करत असल्याचे पीसीसीओईआरचे संचालक प्राचार्य डॉ. हरीश तिवारी यांनी सांगितले. त्या अंतर्गत "प्रभावी संशोधन लेखन, तत्वे आणि सराव" या विषयावर आंतरराष्ट्रीय शिक्षक विकास परिषदेचे ऑनलाईन आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत देश, विदेशातील तज्ज्ञ वक्त्यांनी संशोधन लेखाची रचना, प्रभावी शीर्षक व सारांश लेखन, साहित्य सर्वेक्षणाची योग्य पद्धत, उच्च दर्जाच्या नियतकालिकांची निवड, संदर्भ व उद्धरण पद्धती तसेच साहित्यचौर्य टाळण्याच्या तंत्रांविषयी सखोल मार्गदर्शन केले. या परिषदेचा उद्देश प्राध्यापक, संशोधक आणि संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे संशोधन लेखन कौशल्य विकसित व्हावे असा आहे. याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून ६५० हून अधिक संशोधकांनी ऑनलाइन पद्धतीने संशोधन प्रबंध सादर केले, हे महाविद्यालयासाठी अभिमानास्पद आहे असेही पीसीसीओईआरचे संचालक डॉ. हरीश तिवारी यांनी सांगितले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड रिसर्च (पीसीसीओईआर) मधील संशोधन व विकास विभागाच्या वतीने "प्रभावी संशोधन लेखन : तत्वे आणि सराव" या विषयावर आंतरराष्ट्रीय शिक्षक विकास परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत डॉ. पारिक्षित महाले (व्हीआयटी, पुणे) यांनी "संशोधनाची ओळख" या विषयावर संशोधनाची मूलभूत तत्त्वे स्पष्ट केली. डॉ. मनीष शर्मा (डीवायपीसीओई, पुणे) यांनी "पद्धतशीर साहित्य सर्वेक्षण" या विषयावर प्रभावी मार्गदर्शन केले.



## जेजुरी नगरीची ग्रामदेवता जानाई देवीची दहा एप्रिल रोजी भरणार यात्रा

**दीडशे वर्षानंतर पहिल्यांदाच होणार यात्रा : ग्रामस्थांचा निर्णय**

**जेजुरी (दै. संध्या)**

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी नगरीची ग्रामदेवता व जागृत श्रद्धास्थान असलेल्या जानाई देवीची दीडशे वर्षानंतर पहिल्यांदाच दहा एप्रिल रोजी यात्रा भरणार असल्याचा निर्णय ग्रामस्थांच्या वतीने घेण्यात आला.

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या जेजुरीच्या खंडोबा देवाच्या वर्षाकाठी दहा यात्रा भरतात. मात्र ग्रामदेवता जानाई देवीची यात्रा मागील दीडशे वर्षापासून काळाच्या ओघात बंद झाली होती. गतवर्षी सुमारे चार कोटी रुपये खर्चून जानाई देवीचे भव्य मंदिर उभारून नवीन मूर्तीची स्थापना करण्यात आली.

जेजुरी ग्रामदेवत सार्वजनिक श्री जानाई देवी मंदिर ट्रस्ट , श्री खंडोबा पालखी सोहळा खांदे करी मानकरी ग्रामस्थ मंडळ व जानाई भाविकांनी यावर्षी जेजुरी येथे जानाई देवीची यात्रा भरविण्याचा संकल्प केला होता. शनिवार दिनांक 7 रोजी सायंकाळी जेजुरी येथील जानाई देवी मंदिरात यात्रेच्या नियोजनासाठी ग्रामस्थांची बैठक बोलवण्यात आली. या बैठकीत एप्रिल महिन्यातील 10 ते 12 या तीन दिवसांत देवीची यात्रा भरविण्याचा निर्णय घेण्यात आला. या कालावधीत देवीचा अभिषेक,महापूजा, देवीच्या रथाची मिरवणूक व गरम प्रदक्षिणा,सांस्कृतिक कार्यक्रम,कुस्त्या,बैलगाडी शर्यत आदी कार्यक्रमाचे नियोजन करण्यात येणार असल्याचे या बैठकीत ठरविण्यात आले. या नियोजन बैठकीत जानाई देवी मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष सुधीर गोडसे, खंडोबा पालखी सोहळा समिती,ग्रामस्थ मंडळाचे अध्यक्ष जालिंदर खोमणे दोन्ही ट्रस्टचे पदाधिकारी कृष्णा कुदळे,गणेश आगलावे, राजाभाऊ पेशवे, महादेव माळवदकर, पंडित हरपळे, छबण कुदळे, संदीप घोणे, सुरेश उबाळे, बाळासाहेब सातभाई, रोहिदास माळवदकर, संतोष खोमणे,आप्पासाहेब बारभाई,दीपक राऊत,सदाशिव बारसुडे, अतुल आगलावे, सचिन कुंभार, स्वप्नील हरपळेल, रवींद्र जोशी, तानाजी नीकुडे, सतीश घाडगे ,जेजुरी नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष गणेश निकुडे, तसेच गणेश शिंदे, बाळासाहेब दरेकर, व मोठ्या संख्येने जेजुरी व पंचक्रोशीतील ग्रामस्थ उपस्थित होते. या बैठकीत यात्रा कमितीतील सदस्य निवडण्यात आले.

## थोडक्यात पण महत्वाचे...




### प्राईम कॉर्नर रस्त्याला दिले सभापतींचे नाव

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्याचे माजी सभापती शिवाजीदादा खैरे यांना त्यांच्या जुन्नर तालुक्यातील उल्लेखनीय कार्याबद्दल नुकताच शिवनेर भूषण पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्यांच्या कार्याची आठवण कायम राहावी आणि नारायणगावची ओळख अधिक दृढ व्हावी या उद्देशाने नारायणगाव ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने, ते ज्या ठिकाणी वास्तव्यास आहेत त्या परिसरातील नव्याने तयार झालेल्या रस्त्यास "सभापती रस्ता" असे नामकरण करण्याचा ठराव संमत करण्यात आला आहे. या नामफलकाचे अनावरण रविवार दिनांक ८ मार्च २०२६ रोजी संपन्न झाले.या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.




### नायगाव येथे सिंहगड विधी महाविद्यालयाचा कायदेशीर साक्षरता अभियान उत्साहात संपन्न

पुरंदर (दैनिक संध्या) : नायगाव (ता. पुरंदर) येथे सिंहगड विधी महाविद्यालयाच्या वतीने आयोजित कायदेशीर साक्षरता अभियान हा उपक्रम दि. ०७ मार्च रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. ग्रामीण भागातील नागरिकांना कायद्याविषयी जागरूक करणे, त्यांचे हक्क व कर्तव्य यांची माहिती करून देणे तसेच कायद्याबाबत असलेले गैरसमज दूर करणे या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून वरिष्ठ अ‍ॅड. राजेंद्र गलांडे, अ‍ॅड.लक्ष्मण घुले आणि अ‍ॅड.मनोहर पवार उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान सर्व मान्यवरांनी उपस्थित ग्रामस्थ व विद्यार्थ्यांना विविध कायद्यांविषयी सविस्तर आणि उपयुक्त मार्गदर्शन केले. दैनंदिन जीवनात नागरिकांना येणाऱ्या कायदेशीर अडचणी, शासनाच्या विविध योजना तसेच नागरिकांचे हक्क आणि कर्तव्य याबाबत त्यांनी मार्गदर्शन करत कायद्याचे ज्ञान प्रत्येक नागरिकासाठी किती महत्त्वाचे आहे यावर भर दिला. या वेळी उपस्थित ग्रामस्थांनी विविध कायदेशीर प्रश्न मांडले. त्या प्रश्नांना मान्यवरांनी समाधानकारक उत्तरे देत त्यांच्या शंकांचे निरसन केले. त्यामुळे उपस्थित ग्रामस्थांना कायद्याबाबत महत्त्वपूर्ण माहिती मिळाली आणि त्यांच्यात कायद्याविषयी जागरूकता निर्माण झाली. नायगावचे मा.सरपंच बाळासाहेब कड,अजिंक्य कड, आलूभाई सय्यद, संतोष गायकवाड इत्यादी मान्यवरांनी कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी त्यांचे देखील मोलाचे योगदान ठरले. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे विद्यार्थ्यांनी सादर केलेले "विधी आख्यान" हे आगळे-वेगळे सादरीकरण. लोककलेच्या माध्यमातून कायद्याविषयी जनजागृती करण्याची ही संकल्पना अत्यंत प्रभावी ठरली. सामाजिक विषयांवर आधारित या सादरीकरणातून नागरिकांना त्यांच्या हक्कांबाबत व कायदेशीर बाबींविषयी माहिती देण्यात आली. उपस्थित ग्रामस्थांनी विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. संपूर्ण कार्यक्रम सिंहगड विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शिल्पा गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. तसेच प्रा. किर्ती कांबळे आणि प्रा. अमोल शेलार यांनीही कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मोलाचे मार्गदर्शन केले.

# महिलांनी महिलांना सन्मानाची वागणूक देणे हाच खरा महिला दिन

## उपविभागीय अधिकारी वर्षा लांडगे : सासवड नगरपरिषदेच्यावतीने जागतिक महिला दिन उत्साहात

**सासवड (दै. संध्या)**

"महिलांनी महिलांना सन्मानाची वागणूक देणे आवश्यक असून हाच खरा महिला दिन आहे. स्त्रीला घर आणि समाजात योग्य स्थान मिळाले पाहिजे. महिलांनी एकमेकींचे ऐकून घ्यावे आणि एकमेकींना पुढे घेऊन जावे," असा मोलाचा सल्ला उपविभागीय अधिकारी (प्रांत) वर्षा लांडगे यांनी दिला.

सासवड नगरपरिषद आणि नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पालिकेच्या आचार्य अत्रे सांस्कृतिक भवनात नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप, उपविभागीय अधिकारी वर्षा लांडगे, ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सुचेता भालेराव, पोलीस उपनिरीक्षक अर्चना पाटील, उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती प्रियांका साकेत जगताप, उपसभापती लिना सौरभ वढणे यांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलन करण्यात आले. तसेच देवी सरस्वती आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.



**आरोग्य, कायदेविषयक मार्गदर्शन आणि १० महिलांना पैठणी बक्षीस**

स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सुचेता भालेराव यांनी महिलांच्या आरोग्यावर भाष्य केले. त्या म्हणाल्या, "महिलांनी आहार, पुरेशी झोप, मेडिटेशन आणि व्यायामाकडे लक्ष द्यावे. प्लास्टिकऐवजी नैसर्गिक साधनांचा वापर करावा. दर सहा महिन्यांनी पोटाची सोनोग्राफी आणि छातीची तपासणी करणे गरजेचे आहे." पोलीस उपनिरीक्षक अर्चना पाटील यांनी कायदेविषयक मार्गदर्शन करताना पालकांनी किशोरवयीन मुलींशी मैत्रीचे नाते जपण्याचे आवाहन केले. याचवेळी पायल वाघोले आणि दुर्गा थोपटे यांनी महिलांना स्वसंरक्षणाचे (सेल्फ डिफेन्स) धडे दिले.

बचत गटातील महिलांच्या उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध स्टॉल्स लावण्यात आले होते. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे लकी ड्रॉ काढून १० भाग्यवान महिलांना पैठणी साडी बक्षीस म्हणून देण्यात आली.

याप्रसंगी मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण, गोविंद लाखे, गटनेते अजित जगताप, विरोधी गटनेते मंदार गिरमे, नगरसेविका स्मिता उमेश जगताप, स्मिता सुहास जगताप, शितल भोंडे, माधुरी राऊत, दिपाली जगताप, नगरसेवक ज्ञानेश्वर जगताप, राजन जगताप, वैभव टकले, प्रदीप राऊत, ज्ञानेश्वर गिरमे यांच्यासह मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. पालिकेच्या जास्मीन मधाळे यांनी प्रास्ताविक केले, तर स्मिता जगदाळे व संतोष देवकर यांनी सूत्रसंचालन केले.

## सफाई कर्मचारी महिलांचा सन्मान सोहळा उत्साहात

**पुणे (दै. संध्या)**

जागतिक महिला दिनानिमित्त विनायक नवयुग मित्र मंडळ ट्रस्ट व हिंद शक्ती सोशल फाउंडेशन यांच्या वतीने पुणे महानगरपालिका प्रभाग क्र. २९ मधील सफाई कर्मचारी महिला भगिनींचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. प्रभात रस्त्यावरील एस.एन.डी.टी. आरोग्य कोठी येथे आयोजित या कार्यक्रमात समाजासाठी निस्वार्थीपणे काम करणाऱ्या महिला सफाई कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी नगरसेवक सुनील पांडे-लोहगांवकर, सिने कलाकार रमेश परदेशी, नगरसेविका मिताली ताई सावळेकर, कल्याणी खर्डेकर, नगरसेवक पुनीत जोशी तसेच पुणे महानगरपालिकेचे वरिष्ठ आरोग्य निरीक्षक नितीन लोखंडे उपस्थित होते. नगरसेवक सुनील पांडे लोहगांवकर म्हणाले, समाजामध्ये अनेकदा दुर्लक्षित राहणाऱ्या सफाई कर्मचारी भगिनींचे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. आपण अजून झोपेत असताना या भगिनी पहाटेपासून शहर स्वच्छ ठेवण्यासाठी रस्त्यावर उतरलेल्या असतात. पाऊस, ऊन, थंडी अशा कोणत्याही परिस्थितीची पर्वा न करता त्या आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडतात. शहर स्वच्छ, सुंदर आणि निरोगी ठेवण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. अशा कर्मचाऱ्यांचा सन्मान करणे ही केवळ औपचारिकता नसून समाजाने त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी असल्याचे त्यांनी सांगितले.

## वेगमर्यादा तोडणाऱ्यांवर आता लेझरची नजर

**■ पुणे ग्रामीणमध्ये स्पीड कॅमेऱ्यांचा पायलेट प्रकल्प सुरू**

**यवत (दै. संध्या)**

वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच रस्ते सुरक्षेला अधिक बळकटी देण्यासाठी पुणे ग्रामीण पोलिसांकडून लेझर स्पीड कॅमेऱ्यांचा पायलट प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. हा प्रकल्प सहा महिन्यांच्या कालावधीसाठी प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात येणार असल्याची माहिती पोलिस प्रशासनाने दिली.



या प्रकल्पाअंतर्गत आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने वाहनांचा वेग अचूकपणे मोजून वेगमर्यादा ओलांडणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच या उपकरणांद्वारे उच्च प्रतीचे छायाचित्र व चित्रफीत नोंदविण्याची सुविधा उपलब्ध असल्यामुळे वाहतूक नियमांचे उल्लंघन स्पष्टपणे नोंदवता येणार आहे.

या कॅमेऱ्यांच्या मदतीने वेगमर्यादा ओलांडणे, वाहन चालवताना मोबाईलचा वापर करणे, हेल्मेट न वापरणे, तसेच सीट बेल्ट न लावणे अशा रस्ते सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर प्रभावी कारवाई होणार आहे. त्यामुळे अपघातांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल, असा विश्वास पोलिस प्रशासनाने व्यक्त केला आहे.

पुणे ग्रामीण भागात मागील काही वर्षांत रस्ते अपघातांचे प्रमाण वाढल्याचे निदर्शनास आले आहे. या पार्श्वभूमीवर तंत्रज्ञानाच्या सहाय्याने वाहतूक नियंत्रण अधिक प्रभावी करण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

या प्रायोगिक प्रकल्पाअंतर्गत जिल्ह्यातील विविध ठिकाणी लेझर स्पीड कॅमेरे तैनात करण्यात आले असून वाहनचालकांनी वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन पोलिस प्रशासनाने केले आहे. प्रकल्प यशस्वी झाल्यास भविष्यात हा उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

## पुरंदर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे संगणक कक्षाचे उद्घाटन

**पुरंदर (दै. संध्या)**

**■ विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून आपले कौशल्य विकसित करावे : अभयकुमार साळुंखे**

सासवड येथील पुरंदर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये स्व.एकनाथकाका जगताप प्रतिष्ठानच्या विद्यमाने अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असा ५० संगणकांचा संगणक कक्ष उभारण्यात आला असून त्याचे उद्घाटन मा.अभयकुमार साळुंखे कार्याध्यक्ष, श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर यांच्या शुभहस्ते पार पडले.



कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर संगणक कक्षाचे फित कापून उद्घाटन करण्यात आले. नव्याने उभारण्यात आलेल्या या संगणक कक्षात ५० अत्याधुनिक संगणक, इंटरनेट सुविधा, प्रोजेक्टर तसेच आवश्यक तांत्रिक साधनसामग्रीची व्यवस्था करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला आहे.

यावेळी बोलताना अभयकुमार साळुंखे यांनी डिजिटल युगात संगणक शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून आपले कौशल्य विकसित करावे, असे आवाहन त्यांनी केले. स्व. एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानच्या या स्तुत्य उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले.

मनोगत व्यक्त करताना प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप यांनी सांगितले की, आधुनिक शैक्षणिक सुविधा व वैज्ञानिक दृष्टीकोन या दोन्ही गोष्टी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहेत. संगणक कक्षामुळे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक ज्ञान मिळणार असून भविष्यातील स्पर्धात्मक परीक्षांसाठी त्यांना मोठी मदत होणार आहे. त्याचबरोबर संगणकीय शिक्षण घेण्यासाठी प्रतिष्ठान मार्फत गरजू विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य सुद्धा करण्यात येणार आहे. कार्यक्रमास प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप, प्राचार्य इस्माईल सय्यदसर,अरुणआप्पा जगताप माजी संचालक सोमेश्वर सहकारी साखर कारखाना, रावसाहेबआण्णा पवार ज्येष्ठ साहित्यिक, सुयश इन्फोटेक चे चैतन्य भोसलेसर,साक्षी मेमाणे, शिक्षकवृंद, विद्यार्थी उपस्थित होते.



## जेजुरी गडावर पर्यावरण पूरक नैसर्गिक रंगाची रंगपंचमी साजरी

**जेजुरी (दै. संध्या)**

महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या खंडोबा देवाच्या जेजुरी गडावर रंगपंचमी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पहाटेची पूजा झाल्यानंतर श्री मार्तंड देवसंस्थान,मेघ मल्हार प्रतिष्ठानचे सचिन उपाध्ये गुरुजी तसेच पुजारी सेवक वर्ग व नित्य सेवेकरी यांच्या वतीने श्री मार्तंड भैरवाला रंग लावण्यात आला व सर्व मूर्तींवर रंगाचे शिंपण करण्यात आले. तसेच जेजुरी गडकोटातील इतर देवी देवतांना रंग लावण्यात आला. पर्यावरण पूरक व नैसर्गिक रंगाची उधळण यावेळी करण्यात आली. यावेळी रंगाची सजावट कलाकार रियाज पानसरे,आशा खुडे,आपाजी जाधव,सूर्यकांत नेवसे,जयकुमार चौंडकर आदींनी केली. श्री मार्तंड देव संस्थांनचे विश्वस्त ,समस्त ग्रामस्थ अधिकारी व कर्मचारी या रंगपंचमी उत्साहात सहभागी झाले होते.

# वणवा लावणारे वनविभागाच्या रडारवर

**मांगणेवाडी (खामगाव) येथील एकास २ दिवसांची पोलीस कोठडी**




**नारायणगाव (दै. संध्या)**

मौजे मांगणेवाडी (खामगाव) ता. जुन्नर येथील मौजे खामगांव वनकक्ष क्र. ८४ मधील शासकीय राखीव वनात इसम नामे करण हरीभाऊ पारधी, अक्षय संतोष जाधव व अन्य तीन जणांनी अपप्रवेश करुन वनास आग लावल्याने मोठ्या प्रमाणात वनक्षेत्र जळून वृक्ष संपदा तसेच वन्यप्राण्यांचे अधिवास नष्ट झाल्याने त्यांचे विरुध्द भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम २६ (१) (b) अन्वये वनपरिमंडळ आलमे रा.गु. क्र. ०४/२०२६ नोंद करण्यात आला आहे. काल दिनांक ०७/०३/२०२६ रोजी मौजे खामगाव राखीव वनकक्ष क्र. ८४ मध्ये बनपाल आलमे हे आपल्या अधिनिस्त वनकर्मचाऱ्यांसह नियमित गस्तीसाठी गेले असता सायंकाळी ०७.०० वा. च्या सुमारास मौजे खामगाव (मांगणेवाडी) चे राखीव वनक्षेत्रामध्ये ठिकठिकाणी वणवा लागल्याचे त्यांना दिसून आल्याने त्यांनी तात्काळ वणवा लागल्याचे ठिकाणी धाव घेतली असता सदर ठिकाणी ४ इसम राखीव वन क्षेत्रास आग लावताना दिसुन आले. त्यातील दोन इसम डोंगराच्या वरच्या भागात ठिकठिकाणी वणवा लावत खामगाव मांगणेवाडी कडून माणिकडोह च्या दिशेने जाताना दिसले व अन्य दोन इसम डोंगराच्या पायथ्या कडील बाजुने राखीव वनक्षेत्रात दोन ते तीन जागेवर वणवा लावत माणिकडोह च्या दिशेने चालले होते. त्यावेळी वनपाल आलमे व त्यांच्या अधिनिस्त वनकर्मचाऱ्यांनी मोठ्या शिताफीने त्यांचा पाठलाग करुन त्यापैकी दोन इसम करण हरीभाऊ पारधी, अक्षय संतोष जाधव यांना पकडले. तथापी अन्य दोन इसम हे अंधाराचा फायदा घेऊन घटना स्थळावरुन फरार झाले असून त्याचा शोध वनविभागाचे पथके घेत आहेत.

दिनांक ०८/०३/२०२६ रोजी ताब्यातील अटकेतील आरोपी करण हरीभाऊ पारधी यास मे. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, जुन्नर यांचे समोर हजर केले असता मा. न्यायालयाने त्यास दोन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. प्रकरणी शासनाच्या वतीने वनपरिक्षेत्र अधिकारी, जुन्नर (प्रा.) श्री. प्रदीप चव्हाण व विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. एस. अवचर यांनी युक्तीवाद केला. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी श्री. चव्हाण म्हणाले की शासकीय राखीव वनात अपप्रवेश करणे, वनास आग लावणे ही कृत्ये भारतीय वन अधिनियम १९२७ च्या तरतुदींचे उल्लंघन असून अशा कृत्याकरिता दोन वर्षा पर्यंतच्या कारवासाची तसेच रक्कम रु. १०,०००/- पर्यंतच्या दंडाची तरतूद असून सदर गुन्हा अजामीन पात्र स्वरुपाचा आहे. सदरची कारवाई वनसंरक्षक पुणे (प्रा.) आशिष ठाकरे, व उपवनसंरक्षक जुन्नर प्रशांत खाडे यांचे मार्गदर्शनाखाली परिविक्षाधिन उपवनसंरक्षक लोकेश पाटील, सहाय्यक वनसंरक्षक अमृत शिंदे, सहाय्यक वनसंरक्षक स्मिता राजहंस, वनपरिक्षेत्र अधिकारी, जुन्नर प्रदीप चव्हाण, वनपाल आलमे, श्री.दिघे, वनरक्षक श्रीम. चिचमलकर, वनरक्षक श्री. रेंगडे व वनपरिक्षेत्र जुन्नरच्या संयुक्त पथकाने यशस्वी केली.

जुन्नर वनविभागामध्ये जुन्नर, आंबेगांव, शिरुर व खेड तालुक्यामध्ये वैविध्यपूर्ण अशी वन व वन्यजीव संपदा आहे. या नैसर्गिक वनसंपदेच्या संरक्षणासाठी वनविभाग अहोरात्र प्रयत्न करत असून वन वणवा लावल्यामुळे मोठ्या प्रमाणात वनांचे व वन्यजीवांचे नुकसान होते. यास्तव वनविभागमार्फत वनक्षेत्रामध्ये ठिकठिकाणी ट्रॅप कॅमेरे बसविण्यात आले असून त्यावर ड्रोन सर्व्हेक्षणाच्या माध्यमातून देखील नजर ठेवली जात आहे. यास्तव कोणही शासकीय राखीव वनात अपप्रवेश करुन नये, वनास आग लावू नये अन्यथा संबंधितांवर भारतीय वन अधिनियम १९२७ व वन्यजीवन (संरक्षण) अधिनियम १९७२ अंतर्गत कडक कारवाई करण्यात येईल. तसेच वनवणवा लावणाऱ्याची नावे वनविभागास कळविल्यास त्यांची नावे गोपनिय ठेवून त्यांना प्रोत्साहनपर बक्षीस देण्यात येईल.